* नागपूर *

* वर्ष ५४ * अंक २१८ *

शुक्रवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२४

किंमत रु. २/- + वितरण खर्च रु. १/-

एकूण किंमत रु. ३/-


पुरवणीसह पाने ८

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com



Published By: Bharatiya Janata Party, Maharashtra | C.D.O Barrack No. 1, Nariman Point, Mumbai- 400020

# मतदान करताना...

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकांची मतदान प्रक्रिया २० नोव्हेंबरला पार पडणार आहेत. या मतदानामध्ये सहभागी आपले लोकशाहीचे कर्तव्य पार पाडण्यासाठी आपण सारेच उत्सुक आहोत. मतदानात सहभागी होण्यासाठी मतदार ओळखपत्राशिवाय अजून १२ प्रकारची ओळखपत्रे ग्राह्य धरली जाणार आहेत असे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. मतदार ओळखपत्र सादर करता येत नसेल तर आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागाद्वारे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅनकार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तवेज, केंद्र अथवा राज्यशासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधान परिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळख पत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकारण मंत्रालयाच्या वतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे पुरावे मतदानासाठी स्वीकारले जाणारा आहेत. अनिवासी भारतीयांना त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक आहे. ओळखपत्र जवळ ठेवा. मतदान करा. लोकशाहीतला आपला हक्क बजावा. आपले सरकार निवडून द्या.

निवडणूक कुजबूज




# महाराष्ट्रामध्ये 'हरियाणा' पॅटर्न

**महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये मराठा समाजाचे नेहमीच वर्चस्व राहिले आहे आणि सर्व राजकीय पक्ष या समाजाला आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत; मात्र या वेळी भाजपने संपूर्ण निवडणूक प्रचारामध्ये मराठ्यांबरोबरच ओबीसी समाजाला महत्त्व दिले आहे, असे दिसते**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या महाराष्ट्रातील निवडणूक प्रचारसभांमध्ये 'काँग्रेस विभाजनाचे राजकारण करत असून जातगणनेच्या माध्यमातून एका जातीला दुसऱ्या जातीविरुद्ध उभे करायचे आहे', असे म्हटले आहे. पंतप्रधान म्हणाले, की काँग्रेसला अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी समाजाची प्रगती नको आहे. मंडल राजकारणाच्या आगमनानंतर ओबीसी जाती एकवटल्या आणि काँग्रेस सतत खालावत चालली आहे आणि त्यामुळे काँग्रेसला ओबीसी समाजाची एकजूट कमकुवत करून तोडायची आहे, असेही पंतप्रधान म्हणाले. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी गेल्या काही वर्षांपासून राजकारणामध्ये ओबीसींच्या हक्क आणि सहभागासाठी सातत्याने आवाज उठवत आहेत. मोदी यांनी 'एक है तो सेफ है'चा नारा दिला, तर याआधी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी 'बाटेंगे ते काटेंगे' या घोषणेद्वारे हिंदू जातींच्या ऐक्याची भाषा केली. गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रामध्ये मराठा आरक्षणाच्या मागणीचे आंदोलन तीव्र झाल्याने महाराष्ट्रातही ओबीसी विरुद्ध मराठा समाज असा संघर्ष चव्हाट्यावर आला आहे. मंडल आयोगाच्या अहवालानंतर ओबीसी समाजाला आरक्षण मिळाले; मात्र मराठा समाज सातत्याने आरक्षणाची मागणी करत आहे. महाराष्ट्रातील ओबीसी समाजाची राजकीय ताकद पाहून अनेक राजकीय पक्षांनी मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी समर्थन दिले; परंतु ओबीसींचा मराठा समाजाला आरक्षण देण्यास विरोध आहे.



महाराष्ट्रामध्ये ओबीसी समाजाची लोकसंख्या ३८ टक्के तर मराठा समाजाची लोकसंख्या ३३ टक्के आहे. महाराष्ट्र लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती आघाडीला मराठा समाजाचे प्राबल्य असलेल्या जागांवर राजकीय फटका बसल्याचे सांगण्यात आले. लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपला मोठा फटका बसला. महायुती सरकार विशेषतः एकनाथ शिंदे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि आंदोलन करणाऱ्या मराठा समाजाच्या बाजूने आहे, असे वाटल्याने लोकसभा निवडणुकीमध्ये ओबीसी मतदार भाजपवर नाराज होते. लोकसभा निवडणुकीमध्ये हा समाजही भाजपपासून दूर गेला; परंतु लोकसभेला बसलेल्या फटक्यानंतर महायुतीने जरांगे यांना अजिबात किंमत दिली नाही. आता जरांगे यांनी पुन्हा आंदोलनाचा इशारा दिला आहे.

ओबीसी मतदार पाठीशी राहावेत, म्हणून भाजप सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. कारण लोकसभा निवडणुकीच्या निकालांवरून दिसून आले आहे, की महाविकास आघाडीसोबत मराठा समाज अधिक दिसत आहे. महाराष्ट्रातील २८८ जागांपैकी १७५ जागांवर ओबीसी मतदार आहेत, तर मराठा समाजाचा प्रभाव बहुतांशी मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये आहे. ११६ जागांवर मराठा समाजाचा प्रभाव आहे. महाराष्ट्रामध्ये ओबीसी मते मिळविण्यासाठी विदर्भामध्ये मोठी लढत सुरू आहे. कारण येथील ६२ पैकी ३६ जागांवर ओबीसी जातीच्या मतदारांचा चांगला प्रभाव आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मान्य केले, की महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये ओबीसी पहिल्यांदाच इतक्या प्रमाणात एकत्र आले आहेत. ओबीसी चेहऱ्याचा हरियाणामध्ये भाजपला फायदा झाला. भाजप नेत्यांचे म्हणणे आहे की, आपल्या रणनीतीचा एक भाग म्हणून पक्ष ओबीसींमधील अज्ञात आणि लहान जाती गटांपर्यंत पोहोचत आहे आणि त्याचा फायदा नुकत्याच झालेल्या हरियाणा निवडणुकीमध्ये झाला आहे.

हरियाणा विधानसभा निवडणुकीमध्ये ओबीसी चेहरा नायबसिंग सैनी यांना आघाडीवर ठेवण्याचा भाजपला फायदा झाला. हरियाणातील काँग्रेसच्या जाट चेहऱ्याच्या भूपेंद्रसिंग हुडा यांच्या विरोधात ओबीसी जाती एकत्र आल्या आणि भाजपने अत्यंत अवघड समजली जाणारी निवडणूक जिंकली. महाराष्ट्रामध्येही भाजपला हरियाणाची पुनरावृत्ती करायची आहे. विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील ओबीसींच्या छोट्या जाती समूहांवर लक्ष केंद्रित करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. महाराष्ट्राच्या निवडणुका जाहीर होण्यापूर्वी मोदी सरकारने केंद्रीय ओबीसी यादीमध्ये सात नवीन जाती गटांचा समावेश केला होता आणि महायुती सरकारने ओबीसींसाठी क्रिमी लेयरदेखील वाढवले होते. हे पाऊल ओबीसी समाजाला आपल्या बाजूने आणण्यासाठी मानले जात होते.

रण तापले

महाराष्ट्रामध्ये भाजप ओबीसी गटांवर लक्ष केंद्रित करत आहे. त्यात तेली, बंजारा, पवार, भोयर, कोमटी, सोनार, गोंड आणि इतर दोन डझन जातींचा समावेश आहे. यापूर्वी १९८० मध्ये भाजपने 'माधव फॉर्म्युला' वापरला होता. माळी, धनगर आणि वंजारी समाजाला एकत्र आणले होते. यामुळे पक्षाला ब्राह्मण–बनिया समाज आणि मराठा समाजाच्या पक्षापासून वेगळे होऊन महाराष्ट्रामध्ये जातीय आधार निर्माण करण्यास मदत झाली.

काँग्रेस उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये ओबीसी समाजामध्ये मोडणाऱ्या धनगर समूहाला आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहे. ओबीसी लोकसंख्येपैकी नऊ टक्के धनगर समूह आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) धनगर समाजाला भाजपच्या अपूर्ण आश्वासनाची आठवण करून देत आहेत. भाजपने धनगर समाजाला अनुसूचित जमातींमध्ये समावेशाचे आश्वासन दिले होते; परंतु ते प्रत्यक्षात आले नाही.

# मावळात शेळके विरोधी सर्व

महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आमदार सुनील शेळके आणि राष्ट्रवादीचे बंडखोर आणि संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अपक्ष उमेदवार बापू भेगडे यांच्यातच मावळ विधानसभा मतदारसंघामध्ये थेट लढत होत आहे. शेळके यांच्या उमेदवारीला सुरुवातीपासूनच विरोध करणाऱ्या मावळातील भाजप नेत्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवार पक्ष, शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष, काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मनसे या पक्षांच्या स्थानिक नेत्यांनी बापू भेगडे यांना पाठिंबा दिला आहे.

**मावळमध्ये अजित पवार गटापुढे अपक्ष उमेदवाराचे मोठे आव्हान आहे. या उमेदवाराला सर्व पक्षांचा पाठिंबा मिळाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार सुनील शेळके विरुद्ध राष्ट्रवादीचे बंडखोर अपक्ष उमेदवार बापू भेगडे यांच्यामध्ये मुख्य लढत होत आहे.**

मावळ विधानसभा मतदारसंघामध्ये सहा जण आपले नशीब अजमावत आहेत. भेगडे यांना पिपाणी ही निशाणी मिळाली आहे. दरम्यान, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसकडून शेळके आणि भेगडे दोघेही इच्छुक होते; मात्र भेगडे यांना उमेदवारी पासून बाजूला करण्यासाठी राज्य कृषी शिक्षण आणि संशोधन महामंडळाचे उपाध्यक्षपद पक्षाने देऊ केले होते; मात्र ते पद नाकारून मला मावळची उमेदवारी द्या असा आग्रह पक्षाकडे धरला होता; मात्र पक्षाने शेळके यांना उमेदवारी दिल्याने नाराज झालेल्या भेगडे यांनी पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदाचाही राजीनामा देऊन पक्षाविरोधात बंड पुकारले होते. २०१९ मध्ये बापू भेगडे यांनीच पुढाकार घेऊन शेळके यांना भाजपमधून राष्ट्रवादीत प्रवेश करून अजित पवार यांना साकळ घालून सुनील शेळके यांना उमेदवारी देण्याचा आग्रह केला होता. भाजपचे बाळा भेगडे यांच्या विरोधात सर्व पक्ष एकत्रित येऊन शेळके यांना भरघोस मतांनी निवडून आणले होते; मात्र आता पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. त्या वेळी पाच वर्षांसाठीच शेळके यांना आमदार करायचे आणि पुढल्या म्हणजेच २०२४ ला दुसऱ्या कोणाला तरी संधी द्यावी, असे ठरले होते असे राष्ट्रवादीचे कार्यकर्ते बोलतात; मात्र शेळके यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे तिकीट जाहीर होताच भेगडे यांनी बंड करून सर्व मित्र पक्षांना सोबत घेऊन अपक्ष निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, मावळमध्ये शेळके यांच्या वर नाराज असलेले सर्व राजकीय पक्ष एकवटले आहेत. भेगडे यांना विजयी करण्यासाठी भाजप नेत्यांनी पदाचे राजीनामा दिले. त्याबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष, शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष, काँग्रेस, मनसे, यांच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनीही भेगडे यांना समर्थन दिले आहे. भेगडे यांच्यासोबत मावळातील सर्व नेते असले, तरी शेळके यांनी ४२ हजार कोटी रुपयांचा निधी आणल्याचा दावा केला जात आहे.

लक्षवेधी लढत



सुनील शेळके | बापू भेगडे

मावळातील कान्हा फाटा येथे जिल्हा रुग्णालय तयार केले. एकविरा देवी गडावर रोपवे चेही भूमिपूजन करण्यात आले. पर्यटनस्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोणावळ्यात स्काय वॉकसारखा मोठा प्रकल्प आणला. वडगाव येथे तहसील कार्यालय, पोलिस ठाणे, वन विभाग यासाठी मोठी इमारत तयार केली आहे. हे होत असताना मावळात मोठ्या प्रमाणात विकासकामे करत सिमेंटचे रोड पाणी यासारखे अनेक उपक्रम राबवून मावळचा विकास केला. त्यामुळे सध्या स्थितीत जनता शेळकेंच्या पाठीमागे राहते, की भेगडे यांच्यासोबत मावळातील सर्व नेते असल्याने बाजी कोण मारणार हे बघणे महत्त्वाचे ठरणार आहे.

मुद्दे आणि गुद्दे

# या नेत्यांकडे सगळ्यांचे लक्ष

२०२४ च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांची रंगत रोजच वाढते आहे. विविध पक्ष, त्यांचे जाहीरनामे आणि प्रचार यांची रणधुमाळी चालू आहे. अनेक मतदारसंघांमध्ये यंदा अनेक तरुण उमेदवार उभे आहेत. त्यामुळे त्या ठिकाणच्या निवडणुका प्रतिष्ठेच्या ठरल्या आहेत. बारामती मतदारसंघामध्ये युगेंद्र पवार उभे आहेत. ते यंदा प्रथमच रिंगणात उतरले आहेत आणि त्यांची लढत त्यांच्या काकांशीच म्हणजे अजितदादा पवार यांच्याबरोबर होणार आहे. अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण भोकर मतदारसंघातून उभ्या आहेत. राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे माहीम मतदारसंघामधून लढत आहेत. त्यांचीही ही पहिलीच विधानसभा निवडणूक आहे. उद्धव ठाकरे यांचे पुत्र आदित्य ठाकरे पुन्हा एकदा वरळी मतदारसंघातून उभे राहिले आहेत. त्यांनी पर्यावरणमंत्री म्हणून काम केले आहे. रोहित पवार यांचीदेखील हे दुसरी विधानसभा निवडणूक आहे. ते पुन्हा एकदा कर्जत जमखेड येथूनच निवडणूक लढवणार आहेत. सुजय विखे पाटील प्रथमच लोकसभेसाठी उभे राहिले तेव्हा त्यांनी अहमदनगर मतदारसंघातून विजय मिळवला होता. पण यंदा लोकसभेला मात्र त्यांचा पराभव झाला. आता ते संगमनेरमधून निवडणूक लढवत आहेत. सुनील तटकरे यांच्या कन्या अदिती तटकरे बालकल्याण खाते सांभाळत होत्या. त्या यंदा श्रीवर्धन मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत.



या तरुण उमेदवारांच्या लढतीकडे साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# अमित देशमुख यांच्यापुढे भाजपचे तगडे आव्हान

**लातूर शहर विधानसभा मतदारसंघामधून विलासराव देशमुख यांचे ज्येष्ठ पुत्र अमित देशमुख चौथ्यांदा निवडणूक लढवत आहेत. यापूर्वी देशमुख यांनी तीन वेळा विधानसभा निवडणूक जिंकली आहे. या वेळी मात्र प्रथमच त्यांना भाजपकडून तगडे आव्हान देण्यात आले आहे.**

लातूर शहर विधानसभा मतदारसंघामध्ये जातीय गणिते महत्त्वाची असतात. येथे लिंगायत आणि मराठा समाज प्रबळ आहे. या वेळी भाजपने माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांची सून डॉ. अर्चना पाटील यांना तिकीट दिलेले आहे. लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर डॉ. पाटील यांनी भाजपत प्रवेश केलेला आहे. त्यातच वंचित बहुजन आघाडीने विनोद खटके यांना उमेदवारी दिलेली आहे. त्यामुळे कागदावर तरी ही निवडणूक तिरंगी असली, तरी मुख्य लढत देशमुख आणि चाकूरकर घराण्यात होणार असल्याने दोन्ही घराण्याची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. देशमुख यांच्या आधी त्यांचे वडील आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख या मतदार संघाचे १९८० पासून प्रतिनिधीत्व करीत आलेले आहेत. या ठिकाणी विलासरावांचा वारसा अमित देशमुख यांनी २००९ पासून चालविण्यास सुरुवात केली आहे. सलग तीन वेळा अमित येथून निवडून आलेले आहेत. भाजपकडून त्यांना फारसे तोडीचे उमेदवार दिले जात नाहीत अशी येथील मतदारांची धारणा होती. त्यामुळे अमित यांचा विजय एकहाती होत असे. त्यांना भाजपकडून फारसे तगडे आव्हान दिले जात नव्हते. यंदा माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या सुनेला भाजपने देशमुख यांच्या विरोधात उभे केले आहे.



अमित देशमुख | डॉ. अर्चना पाटील

डॉ. अर्चना पाटील सुशिक्षित असून आपल्या रुग्णालयाच्या माध्यमातून त्यांचा जनसंपर्क मोठा आहे. २०१९ पासून त्या निवडणुकीची तयारी करीत आहेत; परंतु कौटुंबिक कारणांनी त्यांनी तेव्हा निवडणूक लढविली नव्हती. दुसरीकडे त्यांचे सासरे शिवराज पाटील चाकूरकर यांनी आपली सून भाजपत गेली असली, तरी आपण भाजपत प्रवेश केलेला नाही असे म्हटले आहे. अनेक वर्षे शिवराज पाटील गेली सक्रिय नसल्याने त्यांचे कार्यकर्तेही देशमुख यांच्याकडे वळले असल्याचे म्हटले जात आहे. पाटील यांची भिस्त सासऱ्यांच्या पुण्याईवर अवलंबून आहे, तर अमित यांच्या पाठीशी वडीलांची पुण्याई आहे. त्यामुळे कोणाचा विजय होतो. याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी काँग्रेसला दलित आणि मुस्लिम मते मिळालेली होती; परंतु लातूर शहर विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची मते खाण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विनोद खटके यांचा काय फायदा होतो, यावर देशमुख यांचे भवितव्य अवलंबून आहे. डॉ. पाटील या लिंगायत समाजाच्या असल्याने त्यांना लिंगायत समाजाचा पाठिंबा मिळणार असल्याचे सांगितले जात असले, तरी देशमुख यांना लिंगायत समाजाची मते मिळण्याची शक्यता अधिक आहे.

लढाई रंगली

# स्वप्ने खरी होतात का?

जनतेला दाखवली गेलेली ही स्वप्ने खरी होतात का? स्पष्ट सांगायचे तर उत्तर 'नाही' असेच आहे. कारण तिथे सत्ताधारी पक्षाची इच्छाशक्ती कमी पडते. त्याचबरोबर सत्तेवर येणाऱ्या पक्षाला काहीही काम करू न देण्याची शपथ घेणारा विरोधी पक्ष पुन्हा नव्या जोमाने आणि ताकदीने उभा राहतो आणि विरोधासाठी विरोध करत राहतो. पण खरेच लोकांना हे हवे आहे? आजवर झाले तेच आणि तसेच? खरेच का लोकांना या रेवडी योजना हव्या आहेत का? मुळात योजना अपेक्षित वर्गापर्यंत पोचतात का? बरेचदा तर त्यातील पळवाटा शोधून गरज नसलेल्या लोकांची घरे भरली जातात. हे सारे बंद व्हायला हवे. कारण लोकांना खरोखरच या फुकट योजना नको आहेत. त्यांना काही तरी ठोस हवे आहे. काही काळ चालू राहून नंतर बंद पडणारे कोणतेही फायदे मिळवण्यापेक्षा कायम उपयोगी ठरेल असे काही लोकांना हवे आहे. तसे पाहिले तर लोकांच्या अपेक्षा खूप कमी आहेत. त्यांना साधेसुधे आणि शांत जीवन हवे आहे. मोकळी आणि शुद्ध हवा, स्वच्छ पाणी आणि सकस अन्न हवे आहे. चांगले शिक्षण हवे आहे. केवळ मुंबई किंवा पुण्यासारख्या कोंडलेल्या शहरात नव्हे तर जो जिथे राहतो तिथेच त्याला शिक्षणाच्या आणि नोकरीच्या संधी हव्या आहेत. प्रवासासाठी विनाखड्ड्यांचे रस्ते हवे आहेत. गरज पडेल तेव्हा उत्तम दर्जाच्या आरोग्य सेवा हव्या आहेत. शहरात जागोजागी भरपूर झाडे आणि बगीचे हवे आहेत.



थोडक्यात, जगण्यासाठी आवश्यक ते लोकांना हवे आहे. लहान मुले, तरुण, ज्येष्ठ आणि अतीज्येष्ठ या प्रत्येकालाच सहज आणि सुखद जगण्यासाठी या किमान गोष्टी हव्या आहेत आणि महत्वाचे म्हणजे यासाठी कष्ट करायला जनता तयार आहे. आयत्या मिळणाऱ्या पैशांपेक्षा त्यांना स्वत: मेहनत करून जगायला अधिक आवडणार आहे. त्यांना माणसासारखे जगायचे आहे. जगण्याचा आनंद घ्यायचा आहे. लोकांना सुरक्षा हवी आहे. लहान मुलांना आणि महिलांना मोकळेपणाने जगण्याची संधी हवी आहे. शाळांच्या जवळपास, त्यांना आवडणाऱ्या गोळ्या चॉकलेट्सच्या माध्यमातून लहान मुलांना ड्रग्सच्या नादी लावणाऱ्या समाजविघातकांपासून सुरक्षा हवी आहे. विनयभंग आणि बलात्कारासारख्या संकटांना सामोऱ्या जाणाऱ्या स्त्रियांना आणि मुलींना त्या क्रूर नराधमांपासून सुरक्षा हवी आहे. गैरव्यवहार करणारा, मग तो कुणीही असो, योग्य शिक्षा आणि तीही लवकरात लवकर झाली पाहिजे ही आज लोकांची अपेक्षा आहे. गुन्हे आणि अपराध करणाऱ्याला पाठीशी घालणारा कुणीही असो, शिक्षा झालीच पाहिजे अशी लोकांची अपेक्षा आहे. आपण निवडून देत असलेल्या उमेदवारांचे चारित्र्य स्वच्छ असावे, त्यांना खरोखरीच देशाच्या आणि राज्याच्या प्रगतीची तळमळ असायला हवी, अशी लोकांची अपेक्षा आहे. खरा आणि कोणत्याही दबावाशिवाय मिळणारा न्याय लोकांना हवा आहे.

नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

✻ नागपूर ✻ | शुक्रवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२४ | ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


अग्राग्रलेख

## खरीखरी...

# पक्ष फुटले, नाते तुटले

महाराष्ट्राची यंदाची निवडणूक मोठी मजेदार आहे. अडीच वर्षांपूर्वी एक पक्ष फुटला. सव्वा वर्षांपूर्वी दुसरा पक्ष फुटला आणि आताच्या फुटलेल्या पक्षातील अनेक वीर जे कधी काळी एक दुसऱ्याचे सख्खे सोबती होते. ते आता पक्के वैरी झालेले आहेत. गंमत अशी आहे की, नवरा बायको एकमेकांच्या विरुद्ध उभे आहेत. काका-पुतण्यांच्या जोड्या तर एकमेकांविरुद्ध शड्डू ठोकून उभ्या आहेत. राजघराण्यातील राजकन्या बापालाच आवाज देत आहे. दोन्ही आघाड्यांमध्ये किती बिघाड्या आहेत. किती मंडळी मैत्रीच्या मैत्रीपूर्ण लढाई लढत आहेत. किती लोक लोकशाहीचा चक्क गैरफायदा उचलत आहेत, हेच समजेनासे झालेले आहे. 'राजकारण गेलं चुलीत' असे कधी काळी म्हटले जायचे. आता राजकारण गॅसच्या शेगडीवर चहा सारखे उकळत असते. त्यातील एका दुसरा थेंब उडाला रे उडाला की, तो एखाद्याला जखमी करून जातो. एक मात्र खरी गोष्ट आहे. ती म्हणजे, या निवडणुकीत जे जे व्यावसायिक कार्यकर्ते आहेत. त्यांचा व्यवसाय अत्यंत जोमात सुरू आहे. अनेक उमेदवार कोमात गेलेले असले. तरी हे बहाद्दर कसेही करून जोमातच असतात. 'जिधर बजे बम, उदर चले हम' अशी परिस्थिती आहे. अशा एकूण वातावरणात भल्याभल्यांना ऐन थंडीत घाम फुटला नाही. तर नवलच असेल, नाही का ? सध्या एकेका मतदार संघाचा खर्च 100 ते 150 कोटींपेक्षा कमी नसतो. आजकाल कोटीच्या कोटी उड्डाणे घेणारे आपल्याला प्रत्येक मतदारसंघात दिसून येतात. हे कोट्याधीश भविष्यात प्रत्येक कामात आपल्या कोट्याची व्यवस्था करून ठेवत असतात. सामान्य जनतेला मात्र शाब्दिक कोट्या करूनच पोट भरावे लागते. भारत देश गरीब आहे, असे कोणीतरी म्हणत असेल. पण या गोष्टीवर आमचा अजिबात विश्वास नाही. ज्याला आपण गरीब मानतो. त्या गरिबापेक्षा जो गरीब नाही आणि श्रीमंतही नाही अशा 'अगरीब आणि अश्रीमंत' कुटुंबांचे चांगलेच हाल सध्या सुरू झालेले आहेत. पैसे न भरता मिळणा ?या गाड्या घेतल्या की, त्याचे हप्ते भरता भरता हा बिचारा मध्यम वर्गातील नवश्रीमंत स्वतःच्या श्रीमंतीचे दिवाळे काढण्यासाठी तयार झालेला असतो. कोण्याही राजकारण्याला या वर्गाची अजिबात चिंता नाही. श्रीमंतांना चिंता करण्याची गरजच नाही आणि गरिबांची गरिबी दूर करण्यासाठी प्रत्येक पक्ष कटिबद्ध आहे. एक म्हणतो मी 100 देईन. लगेच दुसरा म्हणतो मी 200 देईन. मग लगेच पहिला म्हणतो मी तीनशे देईन. असा चढत्या भाजणीचा कार्यक्रम करून राजकारण करणारे आपले नेते हे चार दिवस देत असतात. त्यानंतरची पुढील पाच वर्षे आणि 365 दिवस फक्त घेत आणि घेतच असतात. आपल्या लोकशाहीची किमया अशी आहे की, राज्याचे दिवाळे निघाले तरी हरकत नाही. पण यांच्या घोषणांना अंत नाही. सध्या अशीच एकूण परिस्थिती आहे. तेव्हा बिचाऱ्या जनतेला आपल्या उरावर राजकारण्यांचे ओझे घेऊन मतदान करणे. हाच आपला धर्म आहे, असे वाटणे स्वाभाविक आहे. तो ज्यांनी त्यांनी पार पाडावा यासाठी आमच्या सर्व मतदारांना मनापासून शुभेच्छा! बाकी पक्षापक्षांच्या पक्षपातामध्ये पक्ष फुटलेले आहेत आणि नाती तुटलेली आहेत.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


## महायुती सरकारने पूर्ण केले

# बाळासाहेबांचे स्वप्न






■ वृत्तसंस्था / प्रतिनिधी
छ. संभाजीनगर, मुंबई, दि. १४ :
छत्रपती संभाजीनगर' शहराचे नाव म्हणजे महायुतीने पूर्ण केलेले बाळासाहेबांचे स्वप्न होय, असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आज छत्रपती संभाजीनगर आणि मुंबई येथील सभेत महाविकास आघाडीवर निशाणा साधला.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज छत्रपती संभाजीनगर मध्ये सभा झाली. या वेळी छत्रपती संभाजीनगर हे या शहराचे नाव महायुतीने केले असल्याचा दावा मोदींनी केला. तर हे बाळासाहेबांचे स्वप्न देखील युतीने पूर्ण केले असल्याचे मोदी यांनी म्हटले आहे.

नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा 'एक है तो सेफ है'चा नारा दिला. काँग्रेस पक्ष आपल्याला जाती-जातीत लढवत आहे.

> **एकनाथ शिंदेचे अभिनंदन**
> नरेंद्र मोदी यांनी सर्वाधिक परदेशी गुंतवणूक आणल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अभिनंदन केले. येणाऱ्या काळात अनेक मोठ्या कंपन्या महाराष्ट्रात काम करणार असून त्यासाठीच महाराष्ट्रात देशातील सर्वात मोठे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात येत असल्याचे मोदी म्हणाले.

महाराष्ट्रातील सरकार महिलांना डबल लाभ देत आहे. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून सरकार मदत करत आहे. मात्र, हे महाविकास आघाडीवाले या योजनेच्या विरोधात न्यायालयात गेले होते. त्यामुळे त्यांचा उद्देश काय आहे? हे तुम्ही ओळखा.

महाविकास आघाडीला यावेळी संधी देऊ नका. काँग्रेसची महाराष्ट्रात सत्ता

> काँग्रेसच्या गल्ल्यावर ठाकरे
> मोहब्बत की दुकान नव्हे तर काँग्रेसचे लुटायचे दुकान असल्याचा आरोप करीत आता त्यांच्या गल्ल्यावर उद्धव ठाकरे बसल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. आमच्या जाहीरनाम्यातील मुद्दे चोरुन त्यांनी जाहीरनामा प्रसिद्ध केला, आमचे अडीच वर्षे आणि तुमचे अडीच वर्षे यातील कामाची तुलना करण्याचे आव्हान देखील त्यांनी दिले. काही लोक दिल्लीत मला मुख्यमंत्री करा, या मागणीसाठी जात असल्याचे म्हणत शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली.

नाही. अनेक राज्यात महाराष्ट्रात सत्ता नाही. त्यामुळे ते सत्ता मिळवण्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतात. काँग्रेसवाले द्वेशाचं विष पेरण्याचं काम करत असल्याची टीका त्यांनी केली.

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी उभ्या आयुष्यात

# संविधान वाचले नाही

### राहुल गांधींचा घणाघात



■ वृत्तसंस्था, नंदुरबार, दि. १४ :
संविधानात बुद्ध, गांधींजी, आंबेडकरांचे विचार यांचे विचार आहे. त्याला कोरं म्हणणे म्हणजे या सर्वांचा अपमान आहे, तो पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. आरएसएस आणि भाजपला संविधान मान्य नाही तर संविधान वाचविण्यासाठी आमची लढाई सुरू आहे, असे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हणाले.

देशातील जमीन, पाणी जगंलावर पहिला अधिकार हा आदिवासींचा आहे. त्यांना केवळ आदिवासी आहे म्हणून मागे ठेवले जाते. नोकऱ्या दिल्या जात नाही. वनवासी म्हणून त्यांचे सर्व अधिकार काढून घेतले जातात. पण संविधानात असा काही शब्दच नाही. नंदुरबार जिल्ह्यात चार विधानसभा मतदारसंघ आहेत आणि महाविकास आघाडीतर्फे चारही विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाला उमेदवारी देण्यात आली आहे. या सभेत बोलताना राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

राहुल गांधी म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात माज्या हातातील संविधान कोरं आहे. मोदींजी माज्या हातातील संविधान कोरं नाही. तुम्ही या संविधानाला कोरं म्हणून, गांधीजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान करतात. संविधानात तुम्हाला कुठेही वनवासी म्हटले जात नाही. यात तुम्हाला आदिवासी म्हटले जाते. म्हणजे देशाचे पहिले मालक.

राहुल गांधी म्हणाले की, वनवासी म्हणजे तुमचा कशावरच अधिकार नाही. जंगल कापून ती जमीन सरकार उद्योगपतींना देण्यात येते. तुमच्या मुलांना नोकरी दिली जात नाही.

> 25 लाख रुपयांचा विमा काढणार, 25 लाखांपर्यंत उपचार मोफत दिला जाणार. अडीच कोटी रोजगार दिले जाणार. पण जो पर्यंत युवकांना रोजगार दिले जाणार नाही तो पर्यंत त्यांना 4 हजार रुपये महिना दिला जाणार. वेदांता प्रकल्प सरकारने गुजरातला दिला, आम्ही ज्या त्या राज्याचे प्रकल्प त्यांच राज्यांना देणार. आदिवासी तरुणांना बाहेर जाऊन मजूर होण्याची गरज पडू देणार नाही. आमचे सरकार आले तर शेतकऱ्यांना 3 लाख रुपयापर्यंत कर्ज माफी देणार, आरक्षणाची मर्यादा आम्ही 50 टक्क्यापेक्षा वाढवू, आम्ही जातीय जणगणना करणार असे राहुल गांधी सभेत म्हणाले.

## वर्ध्यात २२ लाखांची रोकड जप्त

■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. १४ :
हिंगणघाट येथील चेक पोस्टवरील केलेल्या कारवाई मोठी रक्कम जप्त करण्यात आली आहे. सुरेश अमनदास गोधानी व जगदीश नंदलाल कुकरेजा रा. नागपूर या दोघांकडून १८ लाख ६३ हजार २१० रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली आहे. तर मोहम्मद शकील खान शकी उल्ला खान रा. हैदराबाद याचे कडून १ लाख १० हजार रुपये जप्त करण्यात आले. उमेश राजस्वामी रा नागपूर व नरेश हिराचंद वेलचानी रा नागपूर या दोघांकडून २ लाख २५ हजार रुपये आरंभा जवळ जप्त करण्यात आले आहेत. एकूण रोकड २१ लाख ९८ हजार २१० रुपये जप्त करण्यात आले आहेत. सर्व रक्कम कोषागार विभागात जमा करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## मोदी युगाचा लवकरच अस्त



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :
विधानसभा निवडणुकीमुळे अवघ्या महाराष्ट्राचे रान पेटले असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या युगाचा अस्त समिप आल्याचे भाकित वर्तवले आहे. विधानसभा निवडणुकीत भाजप व त्यांच्या मित्रपक्षांच पराभव निश्चित आहे. त्यामुळे देशातील मोदी युगाचा अस्त लवकरच होईल, असे ते म्हणालेत.

राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी एका हिंदी वृत्तपत्राला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी मोदी युगाच्या अस्ताची भाषा केली. ते म्हणाले, महाराष्ट्रात भाजप व त्यांच्या मित्र पक्षांचा पराभव जवळपास निश्चित आहे. निवडणुकीत त्यांचा पराभव झाल्यास हा संदेश संपूर्ण देशात जाईल.

पंतप्रधान मोदी देशाचे सरकार चालवत आहेत, पण त्यांच्यावर आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू व बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांची मदत घेण्याची वेळ आली आहे. हे दोन्ही नेते एकेकाळी त्यांच्या राजकीय धोरणांवर टीका करत होते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आल्यास देशातील मोदी युगाचा अस्त होत असल्याचा संदेश देशात जाईल, असे पवार म्हणाले.

## आघाडीच्या उमेदवाराच्या गाड्यांच्या ताफ्यावर दगडफेक

■ वृत्तसंस्था, भोकरदन, दि. १४ :
जालना जिल्ह्यातील भोकरदन विधानसभा मतदारसंघाची निवडणूक आता मुद्द्यावरून गुद्द्यावर आली आहे.

दगडवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार चंद्रकांत दानवे हे गावातील प्रचार सभा आटोपून आपल्या सोबतच्या स्थानिक कार्यकर्त्यांसोबत गाड्यांचा ताफा घेऊन निघाले असता दगडवाडी भोकरदन रस्त्यावर शाळेच्या समोर अंधाराचा फायदा घेऊन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या गाड्यांच्या ताफ्यावर दगडफेक केली.

उमेदवार चंद्रकांत दानवे यांची गाडी पुढे निघून गेली होती. मात्र, पाठीमागील असलेल्या गाडीत त्यांचे कार्यकर्ते तसेच भोकरदनचे माजी आमदार संतोष दसपुते यांचे पुत्र राजेंद्र दशपुते होते. दसपुते यांच्या खांद्याला लागून ते जखमी झाले आहेत.

## प्रियांका गांधी यांची गडचिरोलीत सभा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :
गडचिरोलीसाठी विजय वडेट्टीवार यांनी चांगलीच मोर्चेबांधणी केली आहे. या मतदारसंघात १७ तारखेला प्रियांका गांधी यांची सभा होणार आहे. प्रियांका यांची ही सभा वडसा येथे होणार आहे. आघाडीच्या उमेदवारांसाठी त्या येत आहेत.



# सर्व मिळून धर्म वाचवू

### कन्हैयांचे आवाहन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :
महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या धर्मयुद्ध विधानावर काँग्रेस नेता कन्हैया कुमारने गुरुवारी नागपूर, महाराष्ट्र येथे प्रतिक्रिया दिली.

ते म्हणाले की, धर्म वाचवण्याच्या गप्पा मारणाऱ्या नेत्याला विचारा की असे तर होणार नाही ना, की धर्म वाचवण्याची जबाबदारी आमची असेल आणि ऑक्सफर्ड-केंब्रिजमध्ये शिकण्याची जबाबदारी तुमच्या मुलांची असेल.

धर्म वाचवायचा असेल तर सर्वजण मिळून तो वाचवू. आम्ही धर्म वाचवू आणि उपमुख्यमंत्र्यांची पत्नी इन्स्टाग्रामवर रील बनवेल असे होणार नाही ना.

राज्यात आता 'व्होट जिहाद' सुरू झाल्याचे फडणवीस यांनी 9 नोव्हेंबरला म्हटले होते. जर ते व्होट जिहाद करत असतील तर आपण 'धार्मिक युद्धा'साठी तयार राहायला हवे.

या देशाचा नागरिक म्हणून लोकशाही वाचवणे हे आपले कर्तव्य आहे. लोकशाहीचे रक्षण करणे हे माझे कर्तव्य आहे, त्यामुळेच मी आज येथे भाषण देत उभा आहे. जर हे धर्मयुद्ध असेल आणि धर्माचे रक्षण धोक्यात आले असेल, तर जो कोणी नेता तुम्हाला धर्म वाचवण्याबद्दल सांगेल, तुम्ही त्या नेत्याला प्रश्न विचारा.

## मोदी साधणार महाराष्ट्रातील १ लाख बुथ प्रमुखांशी संवाद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :
भारतीय जनता पार्टीने आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माझा बुथ, सर्वात मजबूत या अभियानाची घोषणा केली आहे.

या अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रातील जवळपास १ लाख बुथ प्रमुखांशी संवाद साधणार आहेत. हा विशेष संवाद नमो ॲपच्या माध्यमातून व ऑनलाइन पद्धतीनं साधला जाईल. येत्या १६ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजता या अभियानाचं आयोजन करण्यात आलं आहे.

भाजपने आपल्या गोटातील कार्यकर्त्यांना प्रेरणा देण्यासाठी आणि त्यांच्यात चैतन्य निर्माण करण्याच्या उद्देशानं या महत्त्वपूर्ण उपक्रमाची आखणी केली आहे. या संवादाद्वारे पंतप्रधान मोदी भाजपच्या निवडणूक रणनितीला बळकटी देतील आणि बुथ पातळीवर पक्षाची पकड अधिक मजबूत करण्यासाठी आवश्यक दिशा-निर्देश देतील.

हा संवाद कार्यक्रम भाजपच्या निवडणूक तयारीतील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. बुथ प्रमुख हा निवडणुकीच्या व्यवस्थापनात कणा मानला जातो आणि त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. या उपक्रमाच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या प्रक्रियेतील त्यांची भूमिका आणि जबाबदाऱ्या स्पष्ट होतील. तसंच, पंतप्रधान मोदी यांचा थेट संवाद कार्यकर्त्यांना नवा जोम आणि आत्मविश्वास प्रदान करेल.

## निवडणुकीमुळे शाळांना तीन दिवस सुटी?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. या अनुषंगाने १८, १९ आणि २० नोव्हेंबर रोजी शिक्षकांच्या निवडणूक कर्तव्यामुळे शाळा भरवणे शक्य नसल्यास शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळा बंद ठेवण्याबाबत निर्णय घेण्यासंदर्भात आवश्यक त्या सूचना देण्याचे निर्देश शिक्षण विभागाने शिक्षण आयुक्तांना दिले आहेत.

राज्यात विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू आहे. निवडणूक प्रक्रियेतील कामकाज आणि प्रत्यक्ष मतदानाच्या प्रक्रियेत शिक्षकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. तसेच अनेक मतदान केंद्रेही शाळांमध्ये असतात. या पार्श्वभूमीवर १८, १९ आणि २० नोव्हेंबर रोजी शाळांना सुटी देण्याचा प्रस्ताव होता. या अनुषंगाने शिक्षण विभागाने शिक्षण आयुक्तांना निर्देश दिले असल्याची माहिती आहे.

## बंटेंगे तो कटेंगे'वर भाजपमध्ये फूट



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :
विधानसभा निवडणुकीदरम्यान चर्चेत असलेल्या 'बटेंगे तो कटेंगे' नाऱ्यावरून भाजप नेत्यांमध्ये मतभेद पहायला मिळाले. लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपमध्ये दाखल झालेले महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि खासदार अशोक चव्हाण यांनी या घोषणेला विरोध दर्शवला आहे.

अशोक चव्हाण म्हणाले, 'बटेंगे तो कटेंगे'चा नारा महाराष्ट्रातील जनतेला आवडणार नाही. या घोषणेची कोणतीही प्रासंगिकता नाही. व्यक्तिशः मी अशा घोषणांच्या विरोधात आहे, कारण ते समाजासाठी चांगले नाही. यातून कोणाच्याही भावना दुखावल्या जाऊ नयेत, हे पाहावे लागेल.

मी माझ्या कामावर विश्वास ठेवतो. मी भाजपमध्ये असलो तरीही मी सेक्युलर हिंदू आहे. मी स्वतःला हिंदुत्वापासून वेगळे केलेले नाही. पण मी सेक्युलर हिंदू आहे. संविधानही हेच सांगते. भाजपमध्ये ही विचारधारा आहे की आम्ही हिंदू आहोत, पण तरीही भाजपमध्ये सेक्युलर असूनही हिंदुत्व मानणारेही लोक आहेत, असेही अशोक चव्हाण म्हणाले.

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी भाजपवर फुटीरतावादी राजकारणाचा आरोप केला आहे. काँग्रेसने या घोषणेचा विशेषतः निषेध करत म्हटले आहे की, हा एका धर्माला दुसऱ्या धर्माच्या विरोधात उभे करण्याचा प्रयत्न आहे.

दरम्यान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बटेंगे तो कटेंगे असा नारा दिला असला तरी, महायुतीमधील घटक पक्षांसह भाजपामधीलही अनेकांनी याचा विरोध केला आहे. सामाजिक सौहार्द बिघडण्याची भीती यातून व्यक्त होत आहे.

> **मी त्या पक्षाची आहे म्हणून समर्थन करणार नाही**
> यापूर्वी पंकजा मुंडे यांनी 'बटेंगे तो कटेंगे' विधानाचा विरोध केला होता. महाराष्ट्रात 'बटेंगे तो कटेंगे' सारख्या घोषणांची आवश्यकता नाही. मी फक्त त्या पक्षाची आहे म्हणून याचे समर्थन करणार नाही. विकास हाच खरा मुद्दा आहे, असा माझा विश्वास आहे. प्रत्येक माणसासाठी येथे जगण्यासाठी पोषक वातावरण बनवणे ही नेत्यांची जबाबदारी आहे. त्यामुळे असे विषय महाराष्ट्रात आणण्याची गरज नाही. योगी आदित्यनाथ यांनी ती घोषणा वेगळ्या संदभार्नं आणि उत्तर प्रदेशच्या राजकीय स्थितीनुसार दिली असावी, असे पंकजा मुंडे म्हणाल्या होत्या.

> **हे महाराष्ट्रात चालणार नाही - अजित पवार**
> दरम्यान, अजित पवार यांनी 'बटेंगे तो कटेंगे' वर बोलताना म्हणाले होते की, अशा प्रकारची विधाने उत्तर प्रदेश आणि झारखंडमध्ये चालत असतील, पण महाराष्ट्रात चालणार नाही. महाराष्ट्र हा साधु-संत, शिवप्रेमी, छत्रपती शिवाजी महाराज आणि आंबेडकरांचा आहे. त्यांची शिकवण आमच्या रक्तात आहे आणि आम्ही त्याच मार्गावर चालत राहू, असे अजित पवार म्हणाले.

# तुतारीने वाजवला नरेंद्र पहाडेंचा बँड





■ महासागर प्रतिनिधी,नागपूर, दि. १४ :
विधानसभा निवडणुकीत अनेक मतदार संघात दररोज नवनवे उलटफेर होत आहेत. प्रतिस्पर्धी उमेदवारांमध्ये राडा तर कुठे मारहाणीपर्यंतच्या घटना समोर येत आहेत . मात्र, भंडारा विधानसभा मतदारसंघात एका अपक्ष उमेदवारावर त्याच्या चिन्हाच्या खालचे नाव पांढऱ्या पट्टीने झाकण्याची नामुष्की ओढवली आहे

अनु. जाती प्रवर्गासाठी राखीव भंडारा मतदारसंघात नरेंद्र पहाडे हे अपक्ष उमेदवार म्हणून उभे ठाकले आहेत. प्रत्यक्षात ते शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे कार्यकर्ते असून, मविआकडून उमेदवारीच्या प्रतिक्षेत होते. परंतु, हा मतदारसंघ काँग्रेसने खेचून घेतल्याने पहाडेंनी अपक्ष म्हणून गोवर्धन पेलण्याचा विडा उचलला. त्यांना प्रत्यक्षात 'पिपाणी' हे चिन्ह देण्यात आले . पोस्टर, बॅनर्स, पॉम्प्लेटवर त्यांनी हेच चिन्ह छापले . परंतु, त्याखाली 'तुतारी' असा उल्लेख केला.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर घड्याळ हे चिन्ह अजित पवार गटाकडे गेले आणि शरद पवार गटाला तुतारी वाजवणारा माणूस असे चिन्ह देण्यात आले.

लोकसभा निवडणुकीदरम्यान पिपाणी चिन्हामुळे काही ठिकाणी गोंधळ उडाल्याने शरद पवार गटाने आक्षेप घेत याचिका दाखल केली होती. त्यावेळी, आयोगाने पिपाणी चिन्हाचा उल्लेख तुतारी असा करू नये, असे बजावले.

दरम्यान, आता विधानसभा निवडणुकीत भंडारा मतदारसंघात अपक्ष नरेंद्र पहाडे यांना पिपाणी चिन्ह देण्यात आले असले तरी त्यांनी त्याखाली तुतारी असा उल्लेख केला. त्यांच्या प्रचारात वाजविण्यात येणाऱ्या गितांमध्येही तुतारी असाच उल्लेख होता.

यासंदर्भात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मोहन पंचभाई यांच्यासह अपक्ष देवांगणा गाढवे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे आक्षेप नोंदविल्याची माहिती आहे . उशिरा मिळालेल्या माहितीनुसार, निवडणूक अधिकाऱ्यांनी नरेंद्र पहाडे यांना तुतारी असा उल्लेख करण्यापासून परावृत्त केले आहे . परिणामी, चिन्हाखालचे तुतारी हे नाव झाकण्याची, या नावावर पांढरी पट्टी लावण्याची तसेच गाण्यातून हे नाव वगळण्याची नामुष्की नरेंद्र पहाडे यांच्यावर आली असून, नव्याने सगळा तामझाम करावा लागणार आहे.

# पत्रकारितेतील भीष्माचार्य कुलदीप नायर

लोकशाहीसाठी वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य व मतभिन्नता राखण्याचा अधिकार मोलाचा आहे, ही ठामपणे भूमिका घेऊन प्रसार माध्यमातून सातत्याने लेखन करणरे कुलदीप नायर हे होते. सध्याच्या शासन काळात त्या दोहेंचाही होत असलेल्या संकोच व त्यात प्रसार माध्यमाची व त्यातला त्याच पुरोगामी विचारांचा पुरस्कार करून अत्यंत निर्भिडपणे प्रसार माध्यमात लेखन करण्याऱ्या पत्रकारांची फार मोठी होत असलेली गळचेपी बघून कुलदीप नायर यावर संतप्त होत होते.
आजचे राजकीय वातावरणही त्यांच्या खुल्या पत्रकारितेला अनुकूल राहिलेले नव्हते. आपल्या भूमिकावर ठाम राहणारे आणि भूमिकांची फार मोठी किंमत मोजणारे पत्रकार व कायकर्ते यांना त्यांच्या स्वतंत्र असण्याची फार मोठी किंमत चुकवावी लागते. ती कुलदीप नायर यांनी यापूर्वी चूकविलेली आहे. त्यासाठी त्यांना एक्सप्रेस दैनिकांचे संपादक पद यापूर्वी सोडावले लागले. अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांकडे पाठ फिरवावी लागली आणि अनेक मोठ्या सन्मानाना कुलदीप नायर यांना मुकावे लागले. कुलदीप नायर यांच्या विचारांचा पुरस्कार वारसा घेऊन स. न. १९७१ पासून मध्य भारत मधून दै. महासागर वर्तमान पत्रांचे संपादक श्रीकृष्ण चांडक नियमित स्वरूपात अत्यंत प्रतिकुल परिस्थितीशी संघर्ष करून आजही चालवित आहे. त्यांचे मुल्याकंन देशाच्या चौथ्या स्तंभाला आजच्या आर्दश पत्रकरितेत येत आहे. हे नाकारता येत नाही.

पत्रकारितेतील भीष्माचार्य असे ज्यांचे वर्णन केले जाते, असे ज्येष्ठ व निर्भिड पत्रकार कुलदीप नायर यांचे दि. १३ ऑगस्ट २०१८ ला (बुधवारी) मध्यरात्री नंतर दिल्लीच्या खासगी रूग्णालयात निधन झाले होते. ते ९५ वर्षाचे होते आणि काही काळापासून आजारी होते.

कुलदीप नायर यांच्या वयाच्या ९५ व्या वर्षी झालेल्या निधनाने गेल्या संपूर्ण शतकाचा डोळस साक्षीदार राहिलेला वजनदार व स्वतंत्र वृत्तीचा पत्रकार देशाने गमावला आहे. देशातील बहुतेक सर्वच प्रमुख इंग्रजी दैनिकांमध्ये संपादक म्हणून सेवा बजवालेला आणि आपला स्तंभ १४ भाषांतील व अनेक देशातील ८० वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करणारा त्यांच्या तोडीचा दुसरा यशस्वी पत्रकार आज देशात दुसरा नाही.

त्यांनी १५ पुस्तके लिहिली आहेत ती १५ पुस्तके वाचकांना मार्गदर्शक ठरणारी व राजकीय नेत्यांना सदैव दिशा दाखविणारी ठरली आहेत. आज पाकिस्तान मध्ये असलेल्या सियालकोट मध्ये १३ ऑगस्ट १९२३ रोजी कुलदीप नायर यांचा जन्म झाला होता. फाळणी नंतर भारतात नायर आले.


इंग्लंड मध्ये पत्रकारितेचे शिक्षण घेऊन त्यांनी तब्बल १० वर्षे भारत सरकारच्या गृहमंत्रालयात प्रवक्तेपण व जनसंपर्क अधिकारी म्हणून काम केले परिणामी प्रशासन व मंत्रालय यांच्या कारभाराची त्यांना जवळून पाहणी करता आली. त्यातूनच त्यांना अतिशय गुंतागुतीच्या व गुढ बातम्या मिळत राहिल्या. सर्वच राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांशी अत्यंत निकटचे व विश्वासाचे संबंध असणारे नायर विचाराने डाव्या विचारसरणीचा पुरस्कार करणारे आणि समाजातील वंचित, शोषित व उपेक्षित वर्गाचे हित जपणारे प्रवक्ता होते.

त्याच सोबत लोकशाही मुल्यांवर निष्ठा राखणारे पत्रकार म्हणून त्या मुल्यांवर आघात करणाऱ्यांशी त्यांनी दरवेळी लढतही दिली. १९७५ च्या आणिबाणित त्यांना तुरंगवास पत्करावा लागला होता.

प्रख्यात संपादक, लेखक आणि मुत्सद्दी असलेले प्रख्यात जेष्ठ पत्रकार कुलदीप नायर यांच्या निधनामुळे देशाने नागरी स्वातंत्र्यासाठी झटणारा तसेच एक लढवय्या प्रामाणिक पत्रकार आज गमावला. कुलदीप नायर यांनी नैतिकता आणि तत्वनिष्ठा यांच्याशी असलेली बांधिलकी कधीही सोडली नाही. अत्यंत मेहनत आणि चिकित्सक वृत्तीच्या बळावर त्यांनी पत्रकारितेच्या पेशाला एक सन्मान मिळवून दिला. पत्रकारितेच्या स्वातंत्र्यासाठी झटणारे ते एक योध्देच होते.

१९८७-८८ च्या काळात महारष्ट्र राज्यात डॉ. श्रीकांत जिचकार यांनी झिरो बजेट आणलेला होता. या झिरो बजटमुळे हजारो तरूणांना शासकीय नोकरीतून त्याकाळी काढले होते, ती संख्या १५ लाखावर होती. एका व्यक्तीच्या पाठीमागे पत्नी, २ मुले, आई वडील असा परिवार होता. म्हणजे की, १५ लाख तरूणांना शासकीय नोकरीतून काढल्या नंतर ६० लाख लोक उपासमारीत सरळ सरळ ढकलेल्या गेले होते. त्यावेळी देशाचे पंतप्रधान पदावर राजीव गांधी विराजमान होते. तर दुसरीकडे बिहारमध्ये मिश्रा सरकारने मानहानी विधेयक बील विधानसभेत चर्चेसाठी आणले होते.

या देशात घडत असलेल्या भयानक घटना बघून मी (विलास मनोहर) १९८७ - ८८ च्या काळात राजीव गांधींच्या महागड्या सुरक्षा व्यवस्थेत कपात करावी, हा पैसा सामान्य लोकांचा आहे. लोकांनी, लोकांसाठी केलेले राज्य



विलास मनोहर
जेष्ठ पत्रकार
गांधी नगर, नागपूर.
9970630568

म्हणजे लोकशाही आहे. देशातील प्रत्येक व्यक्तीचे मुलभुत हक्क कायम राहवे. त्यांना त्यांचे हक्क व अधिकार मिळावे. हे भारतीय राज्य घटनेचे दिशा निर्देश तत्व आहेत. असे असतांना महाराष्ट्रात नोकरी कपात करून झिरो बजटह्व लावला जातो आहे. ही घटना अत्यंत दुःखद आहे. मग राजीवजींच्या सुध्दा सुरक्षेत कपात करावी, या आशयाचा लेख एका दैनिकात प्रसिध्द झाला होता.

हाच माझा विषय घेऊन जेष्ठ पत्रकार कुलदीप नायर यांनी त्याकाळात दै. लोकमत, नागपूर आवृत्ती मध्ये राजीवजींच्या सुरेक्षेत कपात व्हावी या मथळ्याखाली लेख लिहला होता. त्याकाळात देशात काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर होते. ते पत्रकारांना दाबण्यासाठी त्यांना एका वेगळ्या दहशतीमध्ये ठेवण्यासाठी प्रेस बिल लॉ मानहानी विधेयक बील संसदेत व राज्यातील विधी मंडळात आणू पाहत होती.

त्यावेळी देशभरातील नामवंत दैनिक वर्तमान पत्रे, यांनी एक दिवस आपली वर्तमानपत्रे प्रकाशित न करता शासनाचा त्याकाळात निषेध केला होता. त्यावेळी नागपूर मध्ये या सर्व घटनाचे नेतृत्व उमेश बाबू चौबे, टी.बी. गोल्हर, एम.वाय, बोधनकर, सिध्दार्थ सोनटक्के, प्रदीप मैत्रा, विश्वास इंदूरकर, जोसेफ राव, विलास मनोहर, श्रमिक पत्रकार संघ, टिळक पत्रकार संघ आणि नागपूरातील नामवंत वृत्तपत्राचे मालक, प्रकाशक, मुद्रक व संपादक यांनी आपली वर्तमानपत्रे त्या दिवशी प्रकाशित केली नव्हती तर दुसरीकडे देशातील सर्व राज्यातील नामवंत दैनिकांच्या संपादकांनी आपली वृत्तपत्रे प्रकाशित केलेली नव्हती.

या घटनेचे राष्ट्रीय नेतृत्व कुलदीप नायर यांनी त्यावेळी केले होते. ही घटना येथे यासाठी नमुद करीत आहे की, कुलदीप नायर हे लोकशाही मुल्ये जपणारे होते. मताभिन्नता राखण्याचा अधिकार मोलाचा आहे. असे मानणारे कुलदीप नायर होते.

नागपूर विद्यापीठानी काही वर्षापूर्वी एका व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून कुलदीप नायर यांना बोलाविले होते, ते दैनिक लोकमतवृत्त समूहातील वर्तमान पत्राचे स्तंभलेखन करीत असत. दै. लोकमत टाईम्स वत्तपत्रात त्यांचा शेवटचा लेख इमिग्रान्टस ऑर व्होट बँक प्रकाशित झाला. वृत्तपत्रांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी लढणारे ते खरे लढवय्ये होते. आपल्या आयुष्यातील आदर्श जपण्यासाठी त्यांनी अनेक लढ्यांचे नेतृत्वही केले सृजनात्मक लेखक असलेल्या नायर यांची लेखणी त्यांच्या अखेरच्या श्वासापर्यंत थांबली नाही. पत्रकार म्हणून वैशिष्ट्यपुर्ण लेखन करताना ते कधीही दबावाखाली झुकले नाही.

एका प्रस्थापित पत्रकार म्हणून प्रशंसेने अशी प्रदीर्घ कारकिर्द गाजवतानाचं त्यांनी ब्रिटन मधील भारताच्या उच्चयुक्तासह, राज्यसभा सदस्य असे अनेक पदेही भूषविली. त्यांनी जिथे कुठे काम केले तिथे त्यांनी आपली उच्च मुल्ये आणि नैतिकतेमुळे खऱ्या पथदर्शकाची भूमिका प्रामुख्याने बजावली. अभ्यासू आणि चिकित्सक वृत्तीमुळे त्यांनी पत्रकारितेला एक प्रतिष्ठा मिळवून दिली.

**बिटविन द लाईन्स**

अंजाम नावाच्या एका उर्दु वृत्तपत्रातून आपल्या कारकिर्दीची सुरूवात केली आणि त्यानंतर त्यांनी इंग्रजी पत्रकारितेकडे आपली वाटचाल केली. त्यांनी युएनआय या वृतसंस्थेत त्याकाळी काम केले. त्यानंतर द स्टेट्समन आणि इंडियन एक्सप्रेसच्या माध्यमातून आपल्या शब्दांची धार अनेक सरकारांना दाखवून दिली. बिटविन द लाईन्स हा त्यांचा सर्वाधिक वाचला जाणारा कॉलमही त्यांच्या अखेरच्या श्वसापर्यत सुरू होता.

लोकशाहीसाठी वृत्तपंत्रांचे स्वातंत्र्य व मतभिन्नता राखण्याचा अधिकार मोलाचा आहे. ही ठामपणे भूमिका घेऊन प्रसार माध्यमातून सातत्याने लेखन करणारे कुलदीप नायर काळात हे होते. सध्याच्या शासनकाळात त्या दोहोंचाही होत असलेल्या संकोच व त्यात प्रसार माध्यमाची व त्यातल्या त्यात पुरोगामी विचारांचा पुरस्कार फार मोठी होत असलेली गळचेपी बघून कुलदीप नायर यावर संतप्त होत होते.

आजचे राजकीय वातावरणही त्यांच्या खुल्या पत्रकारितेला अनुकूल राहिलेले नव्हते. आपल्या भूमिकावर ठाम राहणारे आणि भूमिकांची फार मोठी किंमत मोजणारे पत्रकार व कायकर्ते यांना त्यांच्या स्वतंत्र असण्याची फार मोठी किंमत चुकवावी लागते. ती कुलदीप नायर यांनी यापूर्वी चूकविलेली आहे. त्याचसाठी त्यांना एक्सप्रेस सारख्या दैनिकांचे संपादक पद यापूर्वी सोडावे लागले. अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांकडे पाठ फिरवावी लागली आणि अनेक मोठ्या सन्मानाना कुलदीप नायर यांना मुकावे लागले.

राजकरण्यांचा राग, कडव्या भूमिका घेणा?्यांचा विरोध पत्रकारांचे स्वातंत्र्य दडपून टाकणाऱ्या मालकशाहीचा रोष आणि समाजातील गरीब व उपेक्षितांची बाजू घेतल्याने धनवंत उद्योगपतीचाही विरोध या साऱ्यांना तोंड देऊनही कुलदीप नायर पत्रकारितेच्या क्षेत्रातील त्यांची उंची कायम राखत अखेर पर्यंत जगले,

कुलदीप नायर अखेर पर्यंत ताठ मानेने व सरळ मनाने जगले. जगाचा निरोपही त्यांनी तसाच घेतला त्यांची स्मृती वृत्तपत्रांच्या क्षेत्रात दीर्घकाळ पर्यंत प्रेरणा व मार्गदर्शन देणारी राहील यात मुळीच शंका नाही.

कुलदीप नायर यांच्या निधनामुळे लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला बसलेला हा फार मोठा धक्का आहे. अगदी अलीकडे त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरील कठोर टीका आपल्या लेखणीतून केली होती.

वर्तमान प्रस्थापित सरकारच्या विरोधात लेखणीच्या माध्यमातून आपली भूमिका स्पष्टपणे मांडली होती. आयुष्याच्या अखेर पर्यंत कुलदीप नायर यांनी आपली तत्वनिष्ठा सोडली नाही. कधीही कुणापुढे झुकले नाही हा एक मोठा धडा आहे.

कुलदीप नायर कधीही प्रसिध्दी आणि पैशाच्या मागे धावले नाहीत. आपल्या सद्सद्विवेक बुध्दीला जे पत्रकारितेच्या निष्ठेबद्दल ते कायम स्वतःला कटिबध्द समजत असत.

●●●●●●●●●

# जननायक बिरसा मुंडा



आज १५ ,नोव्हेंबर, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते.

घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला.

या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिवार्हासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही.

१८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसाऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला. त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते.

आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला.

दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या.

आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही, त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली.

१८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला. त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला.

न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात.

नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे.

आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

■ ■ ■

दोन्ही लेख



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# गुरू नानक देव



आज कार्तिक पौर्णिमा, आज शीख समुदायाचे लोक श्री गुरू नानक देवजी यांचा जन्मोत्सव साजरा करतात. वास्तविक श्री गुरु नानक देवजी यांचा जन्म १५ एप्रिल १४६९ रोजी झाला मात्र शीख धर्माचे अनुयायी त्यांचा जन्मोत्सव कार्तिक पौर्णिमेलाच साजरा करतात. गुरू नानक देवजी हे शीख धर्माचे संस्थापक व पहिले गुरु होते.

गुरू नानक देवजी यांचा जन्म पाकिस्तानातील लाहोर जवळील तलवंडी येथे एका हिंदू कुटुंबात झाला. आजही या गावाला नानकना साहिब असे म्हणतात. गुरू नानक यांचा जन्मोत्सव प्रकाश पर्व म्हणूनही साजरा केला जातो. गुरू नानक देव लहानपापासूनच धार्मिक वृत्तीचे होते मात्र कर्मकांड आणि बुरसटलेले विचार त्यांना मान्य नव्हते म्हणूनच त्यांनी मौजीबंधनाच्यावेळीच जानवे घालण्यास नकार दिला होता होता.

हिंदू धर्मातील कर्मकांड, बुरसटलेले विचार, अनिष्ट चालीरीती, विषमता, जातीभेद, स्त्रियांना दिली जाणारी हिन वागणूक त्यांना मान्य नव्हती. म्हणूनच ज्ञान प्राप्तीनंतर त्यांनी शीख धर्माची स्थापना केली. शीख धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी जगभर यात्रा काढली.

या दरम्यान त्यांनी जगभरातील अनेक धार्मिक स्थळांना देखील भेटी दिल्या. त्यांनी त्या काळात केवळ भारतातीलच धार्मिक स्थळांना नव्हे तर इराक मधील बगदाद आणि सौदी अरेबियातील मक्का मदिना या धार्मिक स्थळांनाही भेटी दिल्या.

या दरम्यान त्यांनी शीख धर्माच्या तत्वांचा प्रसार आणि प्रचार केला. सर्वसामान्यांमध्ये देव आणि धर्माबाबत जागृती निर्माण करण्यासोबतच त्यांनी हिंदू मुस्लिम एकतेचा संदेशही दिला.

त्यांनी स्थापन केलेला शीख धर्म उदात्त, समतेच्या शिकवणुकीमुळे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात रुजला. आज शीख धमार्चे अनुयायी केवळ आशिया खंडातच नाही तर युरोप आणि अमेरिका खंडातही आहे.

जगातील प्रमुख धर्मापैकी एक म्हणून शीख धर्म ओळखला जातो. गुरू नानक यांची मानवतावादावर दृढ श्रद्धा होती. त्यांचे चिंतन धर्माच्या सत्य आणि शाश्वत मूल्यांचे मूळ होते म्हणूनच जात धर्म यापलीकडे जाऊन सर्वांनी एकत्र यावे, माणूस म्हणून एकत्र राहावे अशी त्यांची इच्छा होती.

सर्व माणसे ही एकाच आईची लेकरे असून त्यांच्यात कोणीही उच्च नीच नाही असे ते मानत. जातीपाती मधील धर्मा धर्मामधील भेदभाव तर मान्य नव्हता. कोणीही हिंदू नाही, कोणीही मुसलमान नाही सर्व जण मानव आहोत असा नारा त्यांनी दिला. त्यांनी एकता, श्रद्धा आणि प्रेमाचे तत्वज्ञान मांडले. ते क्रांतिकारक विचारांचे होते. त्यांच्या विचारांमुळेच शीख धर्म साता समुद्रापार गेला. ७ सप्टेंबर १५३९ रोजी श्री गुरु नानक देवजी यांचे महानिर्वाण झाले. त्यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन! ■ ■ ■

# नोटा करतो अराजकासाठी मोकळ्या वाटा...

अमिता आपटे

लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेले राज्य म्हणजे लोकशाही. या राज्यव्यवस्थेत प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा अधिकार आहे, नव्हे ते त्याचे कर्तव्य आहे. लोकशाहीतील लोकांच्या थेट सहभागातील प्रक्रियांमधील सर्वात प्रभावशाली प्रक्रिया म्हणजे मतदान. म्हणूनच मतदानाचा दिवस हा लोकशाहीचा उत्सव असे म्हटले जाते. पण कोणाला मतदान करावे असा पर्याय आम्हाला दिसत नाही.

त्यामुळे कोणत्याच उमेदवाराला आम्हाला निवडून द्यायचे नाही, अशी इच्छा बाळगणाऱ्यांसाठी NOTA (none of the above) हा पर्यायदेखील काही लोकतांत्रिक देशांमध्ये मतदारांना मिळालेला आहे. भारतात हा पर्याय २०१४ सालच्या सार्वत्रिक निवडणुकांपासून अस्तित्वात आला.

नोटाची पार्श्वभूमी

२००९ साली निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात नोटाचा पर्याय EVM मशीन्सवर उपलब्ध करून देण्याबाबत पाठपुरावा केला होता. तेव्हा केंद्रातील काँग्रेस सरकारकडून NOTA च्या पयार्याला कडाडून विरोध झाल्यामुळे निवडणूक आयोग हा पर्याय अंमलात आणू शकले नाही.

पुढे 'पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज' या संस्थेने सर्वोच्च न्यायलयात जनहित याचिका दाखल केली. ह्या जनहित याचिकेवर निर्णय देताना २७ सप्टेंबर २०१३ रोजी सर्वोच्च न्यायलयाने नोटाचा पर्याय मतदारांना दिला गेला पाहिजे, अशा स्वरूपाचा आदेश दिला आहे. यातली गंमत अशी की या पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज संस्थेने नक्षली कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या आरोपात दोषी सिद्ध झालेल्या प्रोफेसर साईबाबाच्या अटकेचा निषेध केला होता. संसदेवर हल्ला करणाऱ्या आतंकवादी अफझल गुरूच्या फाशीचा निषेध दर्शवणारी प्रेस नोट देखील ह्या संस्थेने २०१३ साली प्रकाशित केली आहे.

**नेमके कशाच्या आधाराने सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला ?**

मतदान हा भारतीय संविधानुसार नागरिकांचा मुलभूत अधिकार (Fundamental Right) नसून वैधानिक अधिकार (Legal Right) आहे. मानवी हक्काच्या वैश्विक जाहीरनाम्यातील कलम २१ (३) आणि राजकीय आणि नागरी हक्काविषयीच्या वैश्विक करारातील कलम २५(ख) असे सांगते कि लोकशाहीत सरकार जनतेच्या इच्छेनुसार बनवले गेले पाहिजे. त्याकरिता असलेली मतदानपद्धती गुप्त असावी, जेणेकरून प्रत्येक व्यक्ती निर्भयतेने मतदान करू शकेल.

लोकप्रतिनिधित्वाचा कायदा, १९५१ मधील तरतुदीनुसार प्रत्येक नागरिकास मतदानाचा अधिकार दिला गेला आहे. पण एखादा नागरिक मतदान केंद्रापर्यंत आला आणि त्याने मतदान करण्यास नकार दिला तर अशा मतदारांच्या नावांची निवडणूक अधिकाऱ्याने फॉर्म १७ अ मध्ये नोंद करावी. अशा स्वरुपाची तरतूद निवडणूक आयोगाने केली होती (पहा नियम क्र. ४९L). EVMची सुरुवात होण्यापूर्वी म्हणजेच १९९८ च्या आधी मतपत्रिकेद्वारे मतदान केले जायचे. कोणत्याच उमेदवारासमोर खुण न करता किंवा पूर्णतः फुली मारून मतपत्रिका मतपेटीत टाकण्याचा प्रयोग मतदार करू शकत होते. यात गुप्तता राखली जातच असे.

इव्हिएम आल्यापासून मात्र मतदारांनी कोणतेही बटण न दाबण्याचे ठरवल्यास बीप चा आवाज होत नाही तसेच बत्तीही पेटत नाही त्यामुळे असा मतदार मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या लोकांच्या सहज लक्षात येऊ शकतो. ह्याच आधारे मतदानातील गुप्तता पाळण्यासाठी NOTA चा पर्याय इव्हिएम मध्ये असला पाहिजे अशा स्वरूपाचा आदेश दिला गेला.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा व्यापक उद्देश 'मतदान न करण्याच्या अधिकाराला' सुरक्षितता प्रदान करणे नसून 'Right to secrecy- मतदानातील गुप्ततेच्या मूल्याचे संरक्षण' करणे हा आहे. पण ज्याला कोणालाच मतदान करायचे नाही तो मतदान केंद्रापर्यंत तरी का जाईल ?

**इतर देशांमधील NOTA चा पर्याय**

भारताव्यतिरिक्त अन्य लोकशाही देशांमध्येही ठडळअ चा पर्याय मतदारांसाठी खुला केला गेला आहे. अमेरिकेतील नेवेडा ह्या प्रांतात None of these candidates नावाने हा पर्याय उपलब्ध आहे. फ्रान्स, बेल्जियम, ब्राझील, ग्रीस, युक्रेन, चिले, बांगलादेश, फिनलैंड, स्वीडन, वरअ, कोलंबिया, नेवेडा आणि स्पेन ह्या तेरा देशामध्ये NOTA चा पर्याय उपलब्ध आहे.

---------------

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■ ■

# एपिलेप्सी : मिथक आणि तथ्ये

एपिलेप्सी म्हणजे वेडेपणा नाही. इतर रोगांप्रमाणे, ही एक न्यूरोलॉजिकल आरोग्य स्थिती आहे. त्याचा उपचार न्यूरोलॉजीमध्ये आहे.
मिरगीचा झटका आल्यावर एखाद्याच्या मोज्यांचा वास दिला पाहिजे, हे चुकीचे आणि अवैज्ञानिक आहे. हे कधीही करू नका.
सुमारे 75% रुग्णांना एपिलेप्सीच्या हल्ल्यापासून औषधांनी आराम मिळतो. मात्र, औषध घेत राहावे लागते. अपस्माराचा झटका आल्यास रुग्णाच्या तोंडात चमचा टाकावा, हे चुकीचे असून त्यावेळी तोंडात काहीही घालू नये. अनेक वेळा रुग्ण स्वतःची जीभ दातांनी दाबतो. अशा स्थितीत रुग्णाच्या तोंडात कापड टाकता येते. पण चमचा किंवा कोणतीही कठीण वस्तू कधीही ठेवू नका. ■ ■ ■

**या कारणांमुळे मिरगी झटका येऊ शकतो**





## वाचक लिहितात

**त्रिपुरारी पौर्णिमा!**

त्रिपुरारि पौर्णिमा हा उत्सव कार्तिक पौर्णिमा या तिथीला साजरा केला जातो. या दिवशी श्री शंकराने त्रिपुरासुर राक्षसाचा नायनाट केल्यामुळे हा उत्सव कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी साजरा करतात. त्रिपुर या दैत्याने ब्रह्मदेवाची आराधना करून त्यांची कृपा प्राप्त केली. त्रिपुराने 'त्याला अमरत्व प्राप्त होवो' असे वरदान ब्रह्मदेवाला मागितले. वरदान मिळाल्यावर त्याने सर्व देवतांचा छळ केला.

श्रीविष्णूलाही त्रिपुराला विरोध करता आला नाही. शेवटी श्री शंकराने तीन दिवस युद्ध करून कार्तिक शुक्ल पक्ष पौर्णिमेला त्रिपुर राक्षसाचा वध केला आणि देवांचे हरवलेले वैभव परत मिळवून दिले. आपले गेलेले वैभव परत मिळालेले पाहून सर्व देवांस आनंदीआनंद झाला आणि त्यांनी शंकराची स्तुती करून दीपोत्सव केला. तेव्हापासून प्रत्येक वर्षी कार्तिक शुद्ध पौर्णिमेस हा उत्सव साजरा केला जातो.

या दिवशी मोठ्या उंच दगडी खांबाच्या सभोवती दिवे लावले जातात. या खांबांना त्रिपुरी म्हणतात. असुरी शक्तीवर चांगल्या शक्तीचा विजय म्हणून हा उत्सव साजरा केल्या जातो. आपण देखील तेजाचे अधिष्ठान असलेला हा दिपोत्सव साजरा करूया. आपल्या मनातील दुष्प्रवृत्तींचा नाश होऊन अंतःकरण निर्मळ व्हावे, अशी या दीपोत्सवाच्या निमित्ताने भगवंताच्या चरणी प्रार्थना करूया.

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा.

## अशोकायन

**लाडक्या बहिणीची विनंती**

दारूमुळे शासनाला
मिळते लय इनकम
त्यामुळे पुर्ण दारूबंदी करा
असं म्हणत नाही एकदम . .

दारुड्याला रेशनकार्ड सारखं
द्यावं फोटोसह परमिट
डेली पाचशे मि.ली. ची लिमीट
परमिट बिना मिळू नये दारू
तरच आमच्या घराची
भावा वाचेल रे आबरू ..

इतकी ढोसतो दारू
राहत नाही सुद
सांग तुझ्या पंधराशेचं
कुठं जाळू उद. .. !



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

प्रपत्र क-१

फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र

माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका (दिवाणी) क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाउंडेशन आणि इतर विरुध्द युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणती दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार.

**उमेदवाराचे नाव व पत्ता** : **राजकुमार सुदाम बडोले**
**पत्ता मु. पो. सडक/अर्जुनी, ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदियाराजकीय**

**पक्षाचे नाव** : **नॅशनलीस्ट कॉंग्रेस पार्टी**
**(अपक्ष उमेदवारांनी येथे ("अपक्ष") असे लिहावे)**

**निवडणुकीचे नाव** : **महाराष्ट्र विधानसभेची सार्वत्रीक निवडणुक -२०२४**

**मतदारसंघाचे नाव** : **६३-अर्जुनी मोरगाव (अ.जा.)**

**मी, राजकुमार सुदाम बडोले** (उमेदवाराचे नाव) वर नमूद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पूर्व चारित्रबद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे :-

| अ. क्र. | (अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे | | |
|---|---|---|---|
| | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे) थोडक्यात वर्णन |
| १ | मा. कोर्ट विद्मान विशेष न्यायाधिश गोंदिया | १६५/२२ | १४३, १८८, २७० भा.द.वि., १३५ बॉ.पो.ॲक्ट आंदोलनाच्या संदर्भात निषेध रॅली काढणे |

| अ. क्र. | (अ) फौजदारी अपराधांसाठी दोषसिध्द ठरविलेल्या प्रकरणांचा तपशील | | जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा |
|---|---|---|---|
| | न्यायालयाचे नाव व (आदेशाचे) दिनांक | अपराधाचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा | |
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

उमेदवाराचे नाव
राजकुमार सुदाम बडोले

परिशिष्ट- 43
(प्रकरण 3, परिच्छेद 3.8)
नमूना सी-1

## फौजदारी गुन्ह्यासंदर्भातील घोषणापत्र

(मा. सर्वोच्च न्यायालयाने विनंती याचिका (दिवाणी) क्र.536/2011 पब्लिक इंटरेस्ट फाउंडेशन व इतर वि. युनियन ऑफ इंडिया व इतर या प्रकरणी दि. 25.09.2018 या न्यायनिर्णयानुसार)

उमेद्‌वाराचे नाव व पत्ता - दुनेश्वर सुर्यभान पेठे, वय 55 वर्षे
प्लॉट नं. 25, हीवरी ले आउट, नागपूर

राजकीय पक्षाचे नाव - नेशनलिस्ट कांग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)

निवडणुकीचे नाव - महाराष्ट्र विधानसभा 2024

मतदारसंघाचे नाव - 54 पूर्व नागपूर

मी दुनेश्वर सुर्यभान पेठे, उपरोक्त निवडणुकीचा उमेद्‌वार जनतेच्या माहितीकरिता खालीलप्रमाणे माझेविरुद्ध असलेल्या फौजदारी प्रकरणासंदर्भात माहिती जाहीर करतो.

| अनु. क्र. | प्रलंबीत फौजदारी प्रकरणे | | | सिद्धदोषी ठरविण्यात आलेल्या फौजदारी प्रकरणाचे विवरण | |
|---|---|---|---|---|---|
| | न्यायालया चे नाव | खटला क. खटल्याची स्थिती व | अंतर्गत असलेल्या संबंधीत अधिनियमांच्या संहितेची कलमे | न्यायालया चे नाव | ज्याकरिता सिद्धदोषी ठरविण्यात आलेल्या अपराधे संक्षिप्त विवरण |
| 1 | जे.एम. एफ.सी.-3 | 777/2023 (कोर्ट पेन्डिंग) | 147, 148, 143 भा.द.वि. | निरंक | निरंक |
| 2 | निरंक | 333/2024 (तपासावर) | 126/2, 132, 190, 191/2, 192, 221, 223 (ए), बी.एन.एस. | निरंक | निरंक |

उमेद्‌वाराची सही

# उमेदवार करतो पदस्पर्श, यवतमाळमध्ये अनोखा प्रचार

**महासागर प्रतिनिधी,**
**यवतमाळ , दि. १४ :** विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. मतदानास अवघे सात दिवस शिल्लक आहे. त्यामुळे मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवार विविध शक्कल लढवत आहेत. यवतमाळातील एका अपक्ष उमदेवाराने तर स्वत: नाचत जनतेच्या पाया पडून (पदस्पर्श)आशीर्वाद मागण्याचा फंडा अवलंबला आहे.

अमरदीप आनंद वानखडे हे तरूण अपक्ष उमेदवार म्हणून यवतमाळ विधानसभेची निवडणूक लढवित आहे. चप्पल ही त्यांची निशाणी आहे. ते दररोज नवनवीन क्लुप्त्या काढत असतात. मतदारसंघात यवतमाळ शहरासह ग्रामीण भाग मोठ्या प्रमाणात आहे. प्रचार यंत्रणा असल्याशिवाय हा मतदारसंघ पिंजून काढणे शक्य होत नाही.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **JAYANT MADHUKARRAO THAKARE.** NOW MY NEW NAME IS **JAYANT MADHUKARRAO THAKRE.**
**ADD :** 316 FLAT NO.102,JAGDAMBA PLAZA GANESH NAGAR NAGPUR 440009

MY OLD NAME WAS **ABDUL RIYAZ / MOHD RIYAZ.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD RIYAZ.**
**ADD :** PLOT NO 483 QASABPURA NAL SAHEB ROAD NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **SAJID ANWAR ANSARI.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD SAJID ANWAR.**
**ADD :** MOMINPURA NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **SOMIYA ANSARI.** NOW MY NEW NAME IS **SOMIYA MOHAMMAD SAJID ANWAR.**
**ADD :** MOMINPURA NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **RAJU NARAYANRAO GHOSEKAR.** NOW MY NEW NAME IS **RAJENDRA NARAYAN GHOSEKAR.**
**ADD :** PLOT NO 18 SURVE LAYOUT HANUMAN NAGAR NAGPUR 440024

## Public Notice

If is hereby informed of the public at large that **Prashant Ashokrao Gaikwad**, Owner of the four wheeler vehicle **(MH - 49. AS 3051 (Maruti Swift Dizare))** has Expired on **08-09-2023,** Smt. Komal Prashant gaikwad, Add - Plot no 262, Sakkardara chauk, om nagar, Nagpur 440009, has been succeeded by **Prashant Ashokrao Gaikwad**, and he is resident of Plot no 262, Sakkardara chauk, om nagar, Nagpur 440009. She being the successor of possession of above mentioned vehicle to confer intent to use the vehicle accordingly, he has applied to RTO authority/Regional transport office Bhandara for the transfer of vchicle on his name any person having any claim or objective in thos regara should inform within 7 days from the date of publication of this notice and bring such fact to that notice of RTO /Transport authority.

Name of Successor
**Smt. Komal Prashant gayakwad**
Plot no 262, Sakkardara chauk, om nagar,
Nagpur 440009
Mob : 9112690264

प्रपत्र सी-१
(उमेदवाराने वृत्तपत्रे, दुरदर्शन या मध्ये प्रसिध्द करण्यासाठी)
फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रिट विनंती याचिका (दिवाणी क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाऊंडेशन आणि इतर विरूद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या निकालानुसार.

**उमेदवाराचे नाव व पत्ता** : **डॉ. मिलिंद पांडूरंग माने**
**401, अष्टविनायक आराधना अर्पाटमेंट, पॉवर ग्रिड चौक, कामठी रिंग रोड, अंगुलीमाल नगर, नागपूर-440026**

**राजकीय पक्षाचे नाव** : **भारतीय जनता पार्टी**

**निवडणुकीचे नाव** : **सार्वत्रिक विधानसभा निवडणूक-२०२४**

**मतदारसंघाचे नाव** : **57, नागपूर उत्तर विधानसभा**

मी, **डॉ. मिलिंद पांडूरंग माने** वर नमूद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून माझ्या फौजदारी पूर्व चरित्राबद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे :-

| | प्रलंबीत फौजदारी प्रकरणे | | | फौजदारी अपराधांसाठी दोषसिद्ध ठरविलेल्या प्रकरणांचा तपशील | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्र. व प्रकरणाची सद्य:स्थिती | संबंधित अधिनियमाचे कलम (कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे) थोडक्यात वर्णन | न्यायालयाचे नाव व आदेशाचा दिनांक | अपराधाचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा |
| १ | जिल्हा सत्र न्यायालय क्र. ७ नागपूर | १२०/२०२२ | भादवि १४१, १४३, ३४१, १८८, २६९, २७० सह क. १३५ | निरंक | निरंक |
| २ | जिल्हा सत्र न्यायालय क्र. ५ नागपूर | २५७/२०२२ | भादवि १८८, सह क. १३५, म.पो.का. | निरंक | निरंक |
| ३ | जिल्हा सत्र न्यायालय क्र. ७ नागपूर | ६३४/२०२१ | भादवि १८८ सह क. १३५ | निरंक | निरंक |
| ४ | जिल्हा सत्र न्यायालय क्र. ७ नागपूर | ७००/२०२० | भादवि १८८, २६९, २७०, २७१ सह क. १३५, ५१ब | निरंक | निरंक |
| ५ | जिल्हा सत्र न्यायालय क्र. ५ नागपूर | ४३६/२०२० | भादवि १८८,२७० सह क. १३५ म.पो. का. | निरंक | निरंक |
| ६ | जिल्हा सत्र न्यायालय क्र. ७ नागपूर | ३७६६/२०१४ | भादवि १८८ सह क. १३५ म.पो.का. | निरंक | निरंक |
| ७ | जिल्हा सत्र न्यायालय क्र. २ नागपूर | ४८५२/२०१० | १३५ म.पो.का. | निरंक | निरंक |
| ८ | जिल्हा सत्र न्यायालय क्र. ६ नागपूर | ३२४५/२००५ | १३५ म.पो.का. | निरंक | निरंक |
| ९ | जिल्हा सत्र न्यायालय क्र. २ नागपूर | ३८/२००५ | भादवि ३४१ | निरंक | निरंक |
| १० | जिल्हा सत्र न्यायालय क्र. ५ नागपूर | १६४/२००४ | भादवि १४३, ३४१ | निरंक | निरंक |

उमेदवाराची सही
**(डॉ. मिलिंद पांडूरंग माने)**

Format C-1

Declaration about Criminal Cases
Name and Address of Candidate: Adv. Ashwin Vinayak Jawade. 409, infront of Cricket Ground Bezonbagh, Nagpur 440014
Name of Political Party – INDEPENDENT
Name of Election : Maharashtra Legislative Assembly
Name of Constituency: North Nagpur Constituency (57)
I, Adv. Ashwin Vinayak Jawade a candidate for the abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

(A) Pending Criminal Cases

| Sr. No. | Name of Court | Case No. and dated | Status of Case | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 09/2020, Ambazari Police Station, Ravinagar Square, Nagpur | 1464/2020, 6th Jt. Civil Judge Jr. Dn and JMFC, Nagpur | Charges not framed | 354 D IPC, Stalking -Whoever commits the offence of stalking shall be punished on first conviction with imprisonment of either description for a term which may extend to three years, and shall also be liable to fine; | In this case I was addressing the issue of corruption hence the said allegations were frame in both matters, I have filed the complaint against the complainant hence the counter complaints were filed against me. |
| 2 | 13/2020, Ganeshpeth Police Station, Ganeshpeth, Nagpur | 3523/2021, 8th Jt. Civil Judge Jr. Dn and JMFC, Nagpur | Summons | 448 IPC - House Tresspass, 294 IPC- Obscene Acts and Songs 506 IPC- Punishment for Criminal Intimidation | |
| 3 | 1250/2022, Jaripatka Police Station, Jaripatka, Nagpur | | not filed in Court, as per the ecourts search | 504IPC - Intentional insult with intent to provoke breach of the peace. 506 IPC- Punishment for Criminal Intimidation, | In the above cases the complainant has falsely encroached and occupied more than 24000 Sq. Ft land, I have filed the complainant against the complainant hence the counter complaints were filed against me. |
| 4 | 133/2023, Jaripatka Police Station, Jaripatka, Nagpur | 14225/2023, 20th Jt. Civil Judge Jr. Dn and JMFC, Nagpur | Summons | 294 IPC- Obscene Acts and Songs, 506 IPC- Punishment for Criminal Intimidation | |
| 5 | 961/2023, Jaripatka Police Station, Jaripatka, Nagpur | | not filed in Court, as per the ecourts search | 325 IPC, Punishment for voluntarily causing grievous hurt, 452 IPC-House-trespass alter preparation for hurt, assault or wrongful restraint. 504IPC - Intentional insult with intent to provoke breach of the peace. 506 IPC- Punishment for Criminal Intimidation, | |
| 6 | 720/2023, Jaripatka Police Station, Jaripatka, Nagpur | | not filed in Court, as per the ecourts search | 504IPC - Intentional insult with intent to provoke breach of the peace. 506 IPC- Punishment for Criminal Intimidation, | |

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




# तरुणांमध्येही हृदयविकाराचे प्रमाण जास्त

आजकालची बदलती जीवनशैली, कामाचा ताण, व्यायामाचा अभाव, जंकफूडचे सेवन यांसारख्या अनेक गोष्टींमुळे लोकांना विविध गंभीर आजारांनी ग्रासले आहे. लठ्ठपणा मोठ्या प्रमाणात वाढत आहे. सध्याची स्थिती पाहता भारत देशासह संपूर्ण जगभरात हृदयविकाराच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. मोठ्या संख्येने लोक हृदयविकाराच्या झटक्याला बळी पडत आहेत.

हृदयविकाराच्या झटक्याने होणारे मृत्यू हे आजच्या घडीला मृत्यूचे सर्वात मोठे कारण आहे. यापूर्वी वृद्धांमध्ये हृदयविकाराचा झटका आढळत होता; परंतु आता तरुण आणि लहान मुले हृदयविकाराचे बळी ठरत आहेत. तर सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे हृदयविकाराचा झटका भारतातील तरुणांना अधिक प्रमाणात बसत आहे. इतर देशांच्या तुलनेत भारतात हृदयविकाराच्या झटक्याचे प्रमाण जास्त आहे. संपूर्ण जगात ५० टक्के हृदयविकाराचा झटका आला असेल, तर त्यापैकी २० टक्के भारतात आहेत. गेल्या १० वर्षांमध्ये देशात हृदयविकाराच्या झटक्यांमध्ये २०० टक्के वाढ झाली आहे, जी सामान्य नाही. हृदयविकाराचा झटका हा सध्या भारतातील नंबर एकवर आहे, ज्याचा परिणाम तरुणांवर होत आहे. तरुणांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण वाढण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्यांची खराब जीवनशैली. यामध्ये मधुमेहासारख्या काही घटकांचा समावेश होतो. मधुमेहाच्या बाबतीतही भारत जगात पहिल्या क्रमांकावर आहे. उच्च कोलेस्टेरॉलची प्रकरणे देखील भारतातील लोकांमध्ये सर्वाधिक आहेत. उच्च रक्तदाबाची प्रकरणेही भारतात सर्वाधिक आहेत.

सतर्कता



हृदयविकाराचा झटका हा जीवनशैलीशी संबंधित आजार आहे. आजच्या तरुणाईच्या वाईट जीवनशैलीमुळे लहान वयातच या तीन गोष्टीही त्यांना घेरतात, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका येतो.

याशिवाय धूम्रपानाची सवय हे देखील हृदयविकाराचे प्रमुख कारण आहे. आता महिलांमध्ये धूम्रपानाचे प्रमाणही पूर्वीपेक्षा वाढले आहे. त्यामुळे त्यांच्यावर हृदयविकाराच्या झटक्यासह इतर मार्गांनीही परिणाम होत आहे.

आजकाल, लठ्ठपणा लहानपणापासूनच मुलांमध्ये दिसू लागतो, जो नंतर त्यांच्या तारुण्यात समस्या बनतो. वाढलेल्या वजनामुळे हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. कारण, वाढलेल्या वजनामुळे मधुमेहदेखील होऊ शकतो. भारतामध्ये कोलेस्टेरॉलची समस्याही अशी आहे की, त्यावर नियंत्रण ठेवणे अशक्य आहे. येथील लोक त्यांच्या कोलेस्टेरॉलच्या पातळीकडे कधीच लक्ष देत नाहीत. हृदयविकाराच्या झटक्यासाठी कोलेस्टेरॉलची पातळी जाणून घेणे महत्त्वाचे आहे. कोलेस्टेरॉल वाढण्याची सर्वात मोठी समस्या म्हणजे जंक फूड, बाहेरचे अन्न, प्रक्रिया केलेले पदार्थ इत्यादी, कारण त्यात ट्रान्सफॅट्सचे प्रमाण जास्त असते. भारतातील तरुणांमध्ये विशेषतः महानगरांमध्ये हृदयविकाराचा झटका येण्याचे प्रमुख कारण प्रदूषण हेदेखील आहे. तरुणांचा निम्म्याहून अधिक वेळ प्रदूषणात व्यतीत होत असल्याने हृदयविकार वाढत आहेत. यासोबतच, मद्यपान आणि धूम्रपान यामुळे धोका वाढण्यास मदत होते. डॉक्टरांच्या मते, तुम्हाला हृदयविकार टाळायचा असेल तर दिवसातून फक्त ४० मिनिटे व्यायाम करा. ४० मिनिटांच्या व्यायामामध्ये, तुम्हाला तुमच्या वॉर्म-अपसाठी पाच मिनिटे व्यायामानंतर थंड होण्यासाठी पाच मिनिटे लागतील, म्हणजे ३० मिनिटे व्यायाम करावा लागेल. दिवसातून दोनदा १५ मिनिटे चालणे, किंवा १५-१५ मिनिटे वेगाने चालत जाऊ शकता.

# वाढत्या प्रदूषणामुळे आयुष्य होऊ शकते कमी



दिवाळीनंतर पुन्हा एकदा दिल्लीच्या हवेमध्ये श्वास घेणे कठीण झाले आहे. हीच स्थिती केवळ राजधानीचीच नाही तर देशातील अनेक शहरांची आहे. 'एअर क्वालिटी इंडेक्स' (एआयक्यू) इतका खराब झाला आहे, की अनेक गंभीर आरोग्य समस्या उद्भवू लागल्या आहेत. एवढेच नाही तर वाढत्या प्रदूषणामुळे आयुर्मानही पाच ते आठ वर्षे कमी होऊ शकते.

शिकागो विद्यापीठाच्या 'एअर क्वालिटी लाइफ इंडेक्स रिपोर्ट' मध्ये असे म्हटले आहे, की भारतातील हवा इतकी खराब झाली आहे, की आयुष्य पाच वर्षांनी कमी होऊ शकते. दिल्लीतील लोकांचे आयुर्मान आठ वर्षांनी कमी होत आहे. आरोग्यतज्ज्ञांच्या मते प्रदूषित हवेचा आयुर्मानावर गंभीर परिणाम होतो. ताजी हवा, स्वच्छ पाणी आणि सकस अन्न हे जीवनासाठी खूप महत्त्वाचे आहे. यामुळे शरीराच्या अनेक भागांवर गंभीर परिणाम होऊ शकतो. प्रदूषित हवेमध्ये श्वास घेतल्याने फुफ्फुसे कमकुवत होतात. प्रदूषणाचे कण फुफ्फुसात स्थिर होतात, तेव्हा ते आकुंचन पावतात आणि आयुष्य कमी होते.

आयुर्मान

तज्ज्ञांच्या मते प्रदूषित हवेमध्ये पीएम २.५ असते. त्यात धूळ, माती आणि रसायनांचे छोटे कण असतात, जे श्वासाद्वारे शरीरात प्रवेश करतात आणि ऑक्सिजनसह प्रत्येक अवयवापर्यंत पोहोचतात आणि त्यांचे नुकसान करतात. त्यामुळे कर्करोगासारख्या आजारांचा धोका वाढतो. एवढेच नाही, तर प्रदूषित हवेमुळे हृदयविकाराचा झटका आणि कमकुवत हृदयाच्या समस्याही उद्भवतात. त्याचा मूत्रपिंड आणि यकृतावरही परिणाम होतो. त्यामुळे आयुर्मान कमी होऊ शकते. हवेच्या प्रदूषणामुळे मेंदूलाही धोका असतो. प्रदूषणामुळे शरीरात सूज येऊ शकते. प्रदूषित हवा शरीरात प्रवेश करते तेव्हा त्याचे कण सायनस, नाक आणि कानांमध्ये चिकटतात. यामुळे श्लेष्मा निर्माण होतो आणि संसर्गदेखील होऊ शकतो. लहान कण रक्तात मिसळतात आणि हृदय आणि मेंदूच्या धमन्यांवर परिणाम करतात. त्यात सूज आल्याने हृदयविकाराचा झटका आणि ब्रेन स्ट्रोकचा धोका वाढतो.

# जास्त वेळ बसून काम करणे धोकादायक

सध्या बदलत्या जीवनशैलीसोबत कामाचे स्वरुपही बदलत चालले आहे. आजकाल बहुतेक लोकांना कामाच्या दरम्यान बराच वेळ बसून राहावे लागते, कारण बहुतेक लोक डेस्क जॉब करतात. 'वर्क फ्रॉम होम' देखील सामान्य झाले आहे. आपण काम करताना आपला संपूर्ण दिवस खुर्चीवर किंवा सोफ्यावर बसून घालवतो आणि शारीरिक हालचाली कमी करतो. आपण आरामात काम करत आहोत, तेवढेच आपले काम आपल्याला आजारी पाडण्यास कारणीभूत ठरू शकते. लोक जास्त वेळ बसून असतात, त्यांचा मृत्यू लवकर होण्याचा धोका असतो. कारण दिवसभर बसून राहिल्याने अनेक गंभीर आजार होतात. जास्त वेळ बसून राहिल्याने लठ्ठपणा, स्नायू कमकुवत होणे, मणक्याचा ताण, कमी रक्तदाब आणि संपूर्ण शरीरातील रक्त परिसंचरण कमी होऊ शकते. जास्त वेळ बसणे पाठ, कंबर, नितंब आणि हृदयाच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. त्याच वेळी, दुसऱ्या अहवालानुसार, जास्त वेळ बसल्याने लवकर वृद्धत्व होते.



जीवनशैली

उदाहरणार्थ, एखादी महिला दिवसातून नऊ ते अकरा तास बसली तर तिला इतर स्त्रियांच्या तुलनेत मृत्यूचा धोका ५७ टक्के इतका असतो. प्रौढ व्यक्तीने आठवड्यातून दोन ते तीन दिवस १५० मिनिटे सतत व्यायाम केल्यास धोका कमी होऊ शकतो. एवढा उपक्रम आठवडाभर पुरेसा आहे. ह्युस्टन विद्यापीठाचे प्रोफेसर मार्क हॅमिल्टन यांनीही असा सल्ला दिला होता, की मानवी शरीर हे बसण्यासाठी नसून फिरण्यासाठी बनलेले आहे. असे केल्यानेच तुम्ही निरोगी राहू शकता, तर सर्वांनी त्याचे पालन केले पाहिजे.

# अस्थमा असेल तर...

वायू प्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होत असताना फुफ्फुस आणि श्वसनाशी संबंधित विकारही वाढत आहेत. वायू प्रदूषणाशी संबंधित विकारांमध्ये अस्थमाचं प्रामुख्याने नाव घ्यावं लागेल. त्यातही शहरांमध्ये राहणाऱ्यांना अस्थमा होण्याची शक्यता अधिक असते. अस्थमा वाढण्याची काही कारणं आहेत. त्याविषयी...

धुळीमुळे अस्थमाला निमंत्रण मिळतं. अस्थमा जडलेल्या लोकांना धुळीचा खूप त्रास होतो. त्यामुळे अस्थमाच्या रुग्णांनी विशेष काळजी घ्यायला हवी. बाहेर पडताना अँटी डस्ट मास्क घालणं गरजेचं आहे. फक्त बाहेर जातानाच विशेष काळजी घ्यावी लागते असं नाही तर आपल्या घरातही धुळीचं साम्राज्य असतं. त्यामुळे घर स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करा. घरात वायू शुद्धीकरण उपकरण बसवा.



धुरामुळेही श्वसनाचे त्रास वाढतात. म्हणूनच अस्थमा रुग्णांनी धुरापासूनही लांब रहायला हवं. स्वयंपाक घरातही धूर होतो. त्यामुळे जेवण बनत असताना स्वयंपाक घरात जाऊ नये. धूम्रपानामुळेही अस्थमाची समस्या वाढते. त्यामुळे अस्थमा रुग्णांनी धूम्रपान करू नये. तसंच धूम्रपान होत असलेल्या ठिकाणी जाऊ नये.

व्याधी विचार

पाळीव प्राण्यांच्या केसांमुळेही अस्थमाच्या रुग्णांना त्रास होऊ शकतो. त्यामुळे त्यांनी कुत्रे, मांजरींपासून लांब रहावं. हे प्राणी पाळण्याचा विचार करू नये. या प्राण्यांचे केस उडत असतात. त्यातच त्यांमध्ये साठलेली धूळ त्रासदायक ठरते. म्हणूनच प्राणी जवळ असतील तर अस्थमा रुग्णांनी काळजी घ्यावी.

ओलसर वातावरणाचा अस्थमा रुग्णांचा त्रास होऊ शकतो. अशा वातावरणात धुलीकण कार्यरत असतात. तसंच आर्द्रता वाढल्याने त्रास होऊ शकतो. घरात अस्थमाचा रुग्ण असेल तर डिह्युमिडिफायर बसवून घ्या. यामुळे घरातली आर्द्रतेची पातळी नियंत्रणात राहू शकेल. त्यातही पावसाळ्यात विशेष काळजी घेणं आवश्यक आहे.

सगळीकडेच वाहनांचं प्रमाण वाढत आहे. त्यातून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे वायू प्रदूषणाची पातळी प्रचंड वाढते आहे. दिल्लीसारख्या शहरांमध्ये तर हवेचा दर्जा खूपच खालावला आहे. अशा परिस्थितीत अस्थमाच्या रुग्णांची संख्या वाढू शकते. श्वसनाचे विकार नियंत्रणात ठेवण्यासाठी योग्य ती काळजी घ्यायला हवी.

## जंकफूडमुळे वाढतो ताण!

नवसंशोधन

परीक्षेच्या काळात विद्यार्थांवर प्रचंड ताण येतो. या ताणामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो. चुकीचा आणि अनारोग्यदायी आहार अशा ताणाला कारणीभूत ठरत असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. आहारात फळं आणि भाज्यांचं प्रमाण कमी असणं आणि फास्टफूडचा अतिरेक ही परीक्षेच्या काळात येणाऱ्या ताणामागची कारणं आहेत.



युरोपियन जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये हे संशोधन छापून आलं आहे. यासाठी शास्त्रज्ञांनी मुलांच्या परीक्षेच्या काळातल्या खाण्यापिण्याच्या सवयींचा अभ्यास केला. १९ ते २२ या वयोगटातल्या २३२ मुलांचं ऑनलाईन सर्वेक्षण करण्यात आलं. त्यातून ही बाब समोर आली आहे. त्यामुळे परीक्षेच्या काळात संतुलित आहारावर भर द्यायला हवा.

## बालपणीच्या दंतविकारांमुळे...

दंतारोग्य

लहान वयात उद्भवणाऱ्या दातांच्या सर्वसाधारण समस्यांमुळे प्रौढ वयात बरेच त्रास होऊ शकतात. त्यातही दातांशी संबंधित छोटे विकारही हृदयविकाराला निमंत्रण देऊ शकतात, अशी धक्कादायक बाब संशोधनातून उघड झाली आहे. जर्नल ऑफ जामा नेटवर्क ओपनमध्ये हा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. या संशोधनात दातांशी संबंधित विविध विकारांचा अभ्यास करण्यात आला. त्यातही पिरिओडोंटिटिसवर अधिक भर देण्यात आला. या व्याधीमुळे भविष्यात कार्डिओव्हॅस्क्युलर विकारांचा धोका वाढतो, असं शास्त्रज्ञांचं मत आहे. त्यामुळे लहान वयातल्या दंतविकारांकडे दुर्लक्ष करू नये. दंतविकारांमुळे मुलं आणि मुलींना प्रौढ वयात हृदयविकाराचा समान धोका असतो असंही यातून समोर आलं आहे.



# हे पाणी पिऊ नका!

रात्रभर उघड्या राहिलेल्या पाण्याच्या ग्लासमधलं किंवा तांब्यातलं पाणी आपण सकाळी पितो. गाडीत बसल्यावर त्यात पडून राहिलेली पाण्याची बाटली तोंडाला लावतो. ही कृती आरोग्याच्या दृष्टीने योग्य की अयोग्य याचा विचार तुम्ही कधी केला आहे का? बराच काळ उघडं राहिलेलं पाणी पिणं टाळायला हवं असं तज्ज्ञ सांगतात. अशा पाण्यात बॅक्टेरियांचा वास असल्याने ते पिण्यायोग्य रहात नाही. बराच काळ उघड्या राहिलेल्या पाण्यात धूळ, जंतू, कचरा तसंच इतर घटक पडतात. पण आपल्याला याची काहीच कल्पना नसते आणि आपण गटागट पाणी पिऊन टाकतो.

आपण कुठे चुकतो?

बराच काळ बाटलीत राहिलेलं पाणीही पिऊ नये. कारण बाटलीला तोंड लावल्यानंतर तिच्या कडांना मृत त्वचा, धूळ आणि घाम लागतो. आपल्या लाळेतही बरेच बॅक्टेरिया असतात. हे सर्व बाटलीतल्या पाण्यात मिसळल्याने ते दूषित होतं. बराच काळ गाडीत राहिलेल्या बाटलीतलं पाणी पिणंही चुकीचं आहे. सूर्यकिरणांमुळे गाडीतल्या बाटलीतलं पाणी गरम होतं. प्लास्टिकच्या बाटलीचा उन्हाशी संपर्क आल्याने त्यातली घातक रसायनं पाण्यात मिसळतात आणि गंभीर विकार जडू शकतात.



झाकून ठेवलेलं पाणी प्यायला काहीच हरकत नाही. बाटलीला शक्यतो तोंड लाऊ नका. तोंड लावलं तर सगळं पाणी एकाच झटक्यात संपवा.

# रक्तशुद्धीसाठी...



आयुर्वेदात रक्तशुद्धीसाठी विशिष्ट पदार्थांचं सेवन करण्यास सांगण्यात आलं आहे. आपल्या दररोजच्या आहारातून शरीरात बरेच अनारोग्यदायी किंवा विषारी घटक जातात. हे घटक रक्तात मिसळून विविध विकारांना निमंत्रण मिळतं. मूत्रपिंडाच्या माध्यमातून हे विषारी घटक मूत्रावाटे बाहेर पडतात. काही आयुर्वेदिक उपायांनी तुम्ही रक्त शुद्ध करू शकता. रक्तशुद्धीसाठी कोणत्या पदार्थांचं सेवन करायला हवं याविषयी...

जेवणानंतर बडिशेप खा. बडिशेपेत रक्त शुद्ध करणारे गुण असतात. बडिशेपेच्या नियमित सेवनामुळे रक्तशुद्धीची प्रक्रिया सातत्याने सुरू रहाते. यामुळे दृष्टीही सुधारते. म्हणूनच जेवणानंतर पाच मिनिटांनी चमचाभर बडिशेप आणि खडीसाखर खा. पचनक्रिया सुधारण्यासाठी तसंच शरीरातून विषद्रव्यं बाहेर टाकण्यासाठी सकाळी उठल्यावर कोमट पाण्यात लिंबाचा रस आणि मध घालून प्या.

आयुर्वेद आणि विकार

आहारात लसूण, आलं आणि कांद्याचा समावेश असावा. त्यातही हे पदार्थ कच्चे खाण्यावर भर द्यायला हवा. भोपळी मिरचीही गुणकारी आहे. तिच्या सेवनाने रक्तातले विषारी घटक बाहेर पडतात शिवाय पचनसंस्थेचं कार्यही सुधारतं. यात अनेक जीवनसत्त्वं आणि पोषक घटक असतात. हळदीतही रक्त शुद्ध करण्याचे गुणधर्म असतात. यातल्या काही घटकांमुळे धमन्यांची सूज कमी होते. काकडीच्या नियमित सेवनानेही रक्त शुद्ध व्हायला मदत होते. बीट, मनुका यांचाही आहारात समावेश असावा.

## डोळे कोरडे होऊ नये म्हणून...

डोळ्यांचं आरोग्य



उन्हाळ्यात आपल्याला आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागते. या दिवसात डोळे कोरडे पडतात. उन्हाळ्यात दिवसा बाहेर पडल्यानंतर सूर्यकिरणं थेट पडत असल्याने डोळ्यांमधलं पाणी सुकून जातं. इतकंच नाही तर डोळ्यांमध्ये जळजळ, खाज जाणवते. टोचल्यासारखं वाटतं. म्हणूनच या दिवसात ड्राय आयची समस्या वाढते. डोळ्यांचा कोरडेपणा टाळण्यासाठी फार वेळ उन्हात राहू नका. डोळ्यांवर गॉगल लावा. दर तीन तासांनी डोळे थंड पाण्याने धुवून टाका. थंडाव्यासाठी डोळ्यांवर काकडीचे काप ठेवा. डॉक्टरांच्या सल्ल्याने ड्रॉप्स घाला.

# असं जपा हृदय

हृदयविकार हे अनेक देशांमधलं मृत्यूचं प्रमुख कारण आहे. यात भारताचाही समावेश करावा लागेल. ताणतणाव, चुकीची जीवनशैली, स्थूलपणा यामुळे हृदयविकार उद्भवतो. गेल्या काही वर्षांत भारतात हृदयविकारामुळे होणाऱ्या मृत्यूचं प्रमाण बरंच वाढल्याचं आकडेवारी सांगते. १९९० ते २०१६ या काळात यात जवळपास ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. ही निश्चितच चिंतेची बाब आहे. जगातल्या काही देशांमध्ये हृदयविकाराचं प्रमाण अत्यल्प असल्याचं काही अभ्यासांमधून समोर आलं आहे. भारतात हृदयविकाराचं प्रमाण कमी करण्याचे प्रयत्न होत असताना अशा देशांकडून आपल्याला प्रेरणा घेता येईल. जपान, फ्रान्स आणि कोरिया या देशांमध्ये हृदयविकाराचं प्रमाण खूप कमी आहे. यामागची नेमकी कारणं जाणून घेऊ या.

आंबवलेले पदार्थ कोरियन लोकांच्या आहारातला प्रमुख हिस्सा आहे. किमची या पदार्थाशिवाय त्यांचं जेवण पूर्ण होत नाही. तज्ज्ञांनी आंबवलेल्या पदार्थांचं महत्त्व अनेकदा सांगितलं आहे. हे पदार्थ आरोग्यदायी असल्याचं त्यांचं म्हणणं आहे. त्यातही हृदयाच्या आरोग्याच्या दृष्टीने आंबवलेले पदार्थ गुणकारी मानले जातात. या पदार्थांमुळे पोटाचं आरोग्य सुधारतं, रोगप्रतिकारक शक्ती वाढते. पचनशक्ती सुधारते. मानसिक आरोग्य उत्तम रहातं आणि वजन कमी व्हायला मदत होते.



आरोग्यवेध

हृदयविकाराची भीती वाटत असेल तर मासे खायला सुरुवात करा. आठवड्यातून एक किंवा दोन वेळा आहारात माश्यांचा समावेश केल्याने हृदयविकाराला आळा बसू शकतो असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. जपानी तसंच कोरियन लोकांच्या आहारात विविध प्रकारचे मासे असतात. यातल्या ओमेगा ३ फॅटी ॲसिड्समुळे हृदयाला बळकटी मिळते.

ग्रीन टी आणि हर्बल टीमध्ये अँटी ऑक्सिडंट्स असतात. यामुळे रक्तदाब आणि कोलेस्टेरॉलचं प्रमाण नियंत्रणात रहातं. इतर देशातले लोक चहा, कॉफी पित असताना जपान, कोरियातले लोक हर्बल आणि ग्रीन टी पितात. जपानी लोकांच्या आहारात लाल मांस कमी प्रमाणात असतं. प्रथिनांची गरज भागवण्यासाठी ते साधं मांस खातात. त्यामुळे कोलेस्टेरॉलचं प्रमाण नियंत्रणात रहातं.

अजून एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जपानी आणि कोरियन लोक कार्यक्षम असतात. या देशांमधले लोक चालतात. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीत जास्त वापर करतात. शरीराला अधिक श्रम देतात. सायकलही चालवतात. यामुळेही हृदयाला बळकटी मिळते. या देशातले लोक ताणतणाव कमी करण्यासाठी झेनचा उपयोग करतात. झेन म्हणजे मेडिटेशनचाच एक प्रकार आहे. आपणही योगा, मेडिटेशन करायला हवं.

जपान, कोरियामधले लोक नियमित आरोग्य तपासणी करून घेतात. प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीमुळे हृदयविकाराचा धोका वेळीच ओळखता येतो. भारतीयांनीही आरोग्य तपासणीवर भर द्यावा.

## लाभ दह्याचे

आजीबाईंचा बटवा

दररोज वाटीभर दही खाल्ल्यामुळे अनेक विकार बरे होऊ शकतात. त्यातही उन्हाळ्यात दह्यामुळे शरीराला थंडावा मिळतो. जेवल्यानंतर पोटात गॅस होण्याची समस्या असेल तर नियमित दही खा. दह्यामुळे शरीरातल्या पीएचचं संतुलन राखलं जातं आणि गॅसचं प्रमाण कमी होतं. जेवणानंतर दही खाल्ल्याने पचनशक्ती मजबूत होते. दही त्वचा आणि केसांसाठीही लाभदायी आहे. दह्यात बेसन घालून चेहऱ्याला लावल्याने त्वचा तजेलदार दिसते. यामुळे चेहऱ्याचा काळपटपणा दूर होतो. केसांचा कोरडेपणा आणि कोंडा दूर करण्यासाठीही दह्याचा वापर करता येईल. दह्यातल्या कॅल्शियममुळे हाडं बळकट होतात.






### उद्धव ठाकरेंच्या अवमानाचा बदला घेण्यासाठी बंडखोराला साथ

# सुनील केदार यांचे अजब तर्कट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

विधानसभा निवडणूक अवघ्या काही दिवसांवर आली असताना महाविकास आघाडीतील धुसफूस पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे.

काँग्रेस नेते सुनील केदार यांनी रामटेक विधानसभा मतदारसंघात ठाकरे गटाच्या उमेदवाराऐवजी तेथील बंडखोर उमेदवाराला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या कथित अवमानाचा बदला घेण्याचे अजब तर्कट मांडले आहे. ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी या प्रकरणी केदार यांच्यावर रामटेकमध्ये गद्दारी केल्याचा आरोप केला आहे.

महाविकास आघाडीच्या जागावाटपात रामटेक विधानसभेची जागा उद्धव ठाकरे गटाला मिळाली आहे. त्यांनी तिथे विशाल बरबटे यांना उमेदवारी दिली आहे. पण काँग्रेस नेते सुनील केदार मात्र बरबटे यांच्याऐवजी काँग्रेसचे अपक्ष उमेदवार राजेंद्र मुळक यांचा प्रचार करत आहेत. काँग्रेस खासदार श्यामकुमार बर्वे हे ही त्यांच्यासोबत आहेत. त्यांच्या या कृतीविषयी पत्रकारांनी त्यांना छेडले असता सुनील केदार यांनी आशिष जयस्वाल यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी गद्दारी केली असून, आपण उद्धव ठाकरे यांच्या अवमानाचा बदला घेण्यासाठी मुळक यांचा प्रचार करत असल्याचा युक्तिवाद केला आहे.



**शिवसेना दुसऱ्याच्या काठीने विंचू मारत नाही**

भास्कर जाधव म्हणाले, दुसऱ्याच्या काठीने विंचू मारावा एवढे आम्ही दुबळे झालो नाहीत. सुनील केदार यांनी रामटेकमध्ये गद्दारी केली हीच वस्तुस्थिती आहे. माझ्याकडे पूर्व विदर्भातील २८ जागांचे कार्यक्षेत्र आहे. तिथे आम्ही केवळ १ जागा घेतली. तिथेही तुम्ही तुमचा बंडखोर उमेदवार उभा करतात. त्याच्या व्यासपीठावर तुम्ही जाता. ही गद्दारी नव्हे तर दुसरे काय? तुम्ही उद्धव ठाकरे यांना कोणती मदत करत आहात? सुनील केदार हे मारुतीच्या बेंबीत बसलेला विंचू आहे. आघाडी असताना कोणत्याही मित्रपक्षाने एवढा विश्वासघात करू नये, असे भास्कर जाधव म्हणाले.

**आशिष जैस्वाल यांचा केदारांना चिमटा**

दुसरीकडे, शिंदे गटाचे उमेदवार आशिष जैस्वाल यांनीही या प्रकरणी उद्धव ठाकरे व सुनील केदार यांचा चिमटा काढला आहे. सुनील केदार हे उद्धव ठाकरे यांची फसवणूक करत आहेत. ठाकरे यांचे संपर्कप्रमुख भास्कर जाधव यांनी त्यांना उघडे पाडले. यामुळे मतदारसंघात त्यांची प्रतिमा मलीन झाली. आता स्वतःची अब्रु वाचवण्यासाठी ते अशा प्रकारचा केविलवाणा युक्तिवाद करत आहेत, असे ते म्हणालेत.

## त्यांना आमच्या जिल्ह्यात भाजप संपवायची आहे

### बच्चू कडू पुन्हा भडकले

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १४ :



अमरावती जिल्ह्यात भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा या भाजपच्या उमेदवारांसाठी जिल्ह्यात जोरदार प्रचार करीत आहेत. पण, महायुतीतील दोन घटक पक्ष राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या अमरावतीतील उमेदवार सुलभा खोडके आणि दर्यापूरचे शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे उमेदवार अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात त्यांनी उघड विरोधी भूमिका घेतली आहे. त्यातच बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा राणा दाम्पत्याला डिवचले आहे.

निवडणूक प्रचारादरम्यान राणा दाम्पत्य अत्यंत खालच्या पातळीवर टीका करीत आहेत. लोकांची बदनामी करीत आहेत. राणा दाम्पत्य भाजपसोबत असले, तरी अंतर्गत बैठका मात्र काँग्रेससाठी घेत आहेत.

त्यांना भाजप संपवायची आहे. या जिल्ह्यात भाजप ज्यांनी उभी केली, पायाभरणी केली, ते भाजपमध्ये कुठे आहेत? नवनीत राणा या २०१९ मध्ये काँग्रेस, राष्ट्रवादीच्या ताकदीवर निवडून आल्या. त्या आता भाजपच्या प्रमुख बनल्या. देशातील एवढा मोठा पक्ष रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाच्या दावणीला बांधून ठेवून भाजपला कमी करण्याचा त्यांचा डाव असल्याचा आरोप बच्चू कडू यांनी केला आहे.

# 'बटेंगे तो कटेंगे' ला काँग्रेसचे 'पढेंगे तो बढेंगे' ने उत्तर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :



उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची बटेंगे तो कटेंगे ही घोषणा सध्या राज्याच्या राजकारणात चांगलीच गाजत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यापुढे जाऊन एक है तो सेफ है असा नारा दिला आहे.

याला काँग्रेसचे नेते आणि खासदार सचिन पायलट यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. पढेंगे तो बढेंगे' हे काँग्रेसचे धोरण असून आम्ही ते आधीपासूनच अंमलात आणीत असल्याचे पायलट यांनी स्पष्ट केले.

विदर्भातील महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पायलट आज नागपूला आले होते. यावेळी त्यांनी बटेंगे तो कटेंगे ही घोषणा मतदारांना अप्रत्यक्षपणे धमकावणारी आणि भीता दाखवणारी असल्याचा आरोप केला.

भाजप नेहमीच दिशाभूल करते, जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करीत असते. निवडणूक आली की अशाच जातीय व धार्मिक मुद्यांवर जोर दिला जातो. दहा वर्षांत काय विकास कामे केली हे ते सांगत नाहीत. भाजपच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात गरीब आणि श्रीमंतांच्या दरीत प्रचंड वाढ झाली आहे. ते फक्त श्रीमंत आणि उद्योगपतीसाठीच काम करतात आणि योजना राबवतात असा आरोप पायलट यांनी केला.

फक्त निवडणुकीत कल्याणकारी घोषणा करतात. महाराष्ट्रात अडीच वर्षांपासून महायुतीचे सरकार आहे. लोकसभेत मोठा फटका बसल्या नंतर त्यांनी लाडकी बहिण योजना आणली. आता शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार असल्याचे सांगत आहे. मात्र सत्तेत असतान या सर्व गोष्टी का केल्या नाहीत याचे उत्तर भाजपचे नेते देत नसल्याचेही पायलट म्हणाले.

महाविकास आघाडीचे उमेदवार चांगले आहेत. त्यांचे वर्तनही चांगले आहे. काँग्रेसचे घोषणापत्र काही चांगल्या योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. त्या आम्ही सत्ता आल्यानंतर निश्चितपणे पूर्ण करणार आहोत. काँग्रेसशासित राज्यांमध्ये घोषणापत्रानुसार सर्व योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. कल्याणकारी राज्याची आमची संकल्पना आहे. गोरगरीबांना काही लाभ द्यावे लागतातच. या योजनांना रेवडी म्हणणे अयोग्य असल्याचे पायलट म्हणाले.

## शिवतीर्थावर धडाडणार राज ठाकरेंची तोफ

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :



मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे, दोघांमध्ये 17 नोव्हेंबर रोजी शिवाजी पार्कवर सभा घेण्यासाठी स्पर्धा लागली होती, मात्र राज ठाकरे यांच्या सभेला परवानगी मिळाली आहे. 17 नोव्हेंबर या दिवशी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचा स्मृतीदिन म्हणून साजरा करण्यात येतो.

शिवतीर्थावर 17 नोव्हेंबरला शेवटची सभा आपल्याला घेता यावी यासाठी दोन्ही ठाकरे बंधूंमध्ये चढाओढ सुरू होती. मात्र अखेर राज ठाकरे यांना सभा घेण्याची परवानगी देण्यात आली आहे. या परवानगीसाठीचा अर्ज मनसे पक्षाकडून आधी देण्यात आल्याने नियमानुसार ही परवानगी दिल्याचे सांगण्यात आले. उद्धव ठाकरे यांची सभा आता बीकेसी मैदानावर घेण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे.

17 नोव्हेंबर बाळासाहेब ठाकरे यांचा 12 वा स्मृतीदिन आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळावर शिवसैनिकांची गर्दी होणार असल्याने इतर कुठल्या पक्षाला या दिवशी सभेसाठी परवानगी दिल्यास संघर्ष उद्भवू शकतो. त्यामुळे या ठिकाणी कोणत्याच गटाला परवानगी दिली जाणार नाही .


## भाजप-शरद पवार गटात जोरदार राडा

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. १४ :

विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला असतानाच नाशकात महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जोरदार राडा झाल्याचा प्रकार समोर आला आहे. भाजप आणि शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली असून वाहने फोडल्याचा आरोप देखील करण्यात आला आहे.

याप्रकरणी सुप्रिया सुळे यांनी आक्रमक भूमिका घेत थेट पोलिस आयुक्तालय गाठले. महायुती आणि महाविकास आघाडीचे कार्यकर्ते भिडल्याने तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. आज भारतीय जनता पक्षाचे उमेदवार राहुल ढिकले यांच्या प्रचारार्थ रॅली सुरू होती. शरद पवार गटाचे उमेदवार गणेश गीते मविआचे कार्यकर्त्यांकडून पैसे वाटत होत असल्याचे भाजप कार्यकर्त्यांना समजले.

त्यानंतर राहुल ढिकले यांचे कार्यकर्ते तेथे पोहोचले. यानंतर दोन्ही उमेदवारांचे कार्यकर्ते आमनेसामने आले. त्यांच्यात जोरदार बाचाबाची होऊन दोन्ही बाजूंनी एकमेकांवर आरोप केले. भाजपच्या कार्यकर्त्यांनी गणेश गीते यांच्या कार्यकर्त्यांकडून पैशांचे वाटप होत आहे, असा आरोप केला. तर भाजपच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला, आमच्या गाड्या फोडल्या, असा आरोप गणेश गीतेंच्या कार्यकर्त्यांनी केला.



# पंधरासे तं भेटतेत वो.. पण महागाईचा कसा?



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :





लाडकी बहीण... लाडकी बहीण... म्हणून सरकारनं महिन्याने पंधरासे रूपये तर देलनं... पर मंहगाई बी तं वाढवलनं . एका हाताने देते अन् दुसऱ्या हातानं काढते बाई . गहु, तांदुळ, खावाचा तेल किती महाग? काही हो का वो हा? ..... हे संतप्त सवाल आहेत, ग्रामीण भागातील महिलांचे.

सर्वच उमेदवारांना प्रचारादरम्यान याचा प्रत्यय येतो आहे. एक दिवस उमेदवारांसोबत या विशेष उपक्रमांतर्गत चमूने भंडारा विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार देवांगणा गाढवे यांच्यासोबत दौरा केला . त्यावेळी, ग्रामिण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील शेकडो महिलांनी प्रचंड वाढलेल्या महागाईविषयी चिंता आणि चीड व्यक्त केली.

भंडारा मतदारसंघातील पवनी तालुक्याच्या कातुर्ली, पिंपळगाव, ब्रम्ही, बाचेवाडी, निघवी, रनेळा आणि इतर अनेक गावांना देवांगणा गाढवे यांनी भेटी देत मतदारांशी संपर्क साधला . यावेळी अनेक महिला, पुरूषांनी त्यांच्या भागातील मुलभूत सोयीसुविधा आणि समस्यांविषयी माहिती दिली . लोकप्रतिनिधींचे या क्षेत्राकडे कायम दुर्लक्ष असल्याचेही ते म्हणाले.

देविदास नामक एका शिक्षीत शेतकऱ्याने सांगितले की, सरकारने श्रीमंतसाठी जीएसटी कमी ठेवली असून, गरीबांवर जीएसटीचा भार टाकण्यात आला आहे . शेतीची अवजारे खरेदी करायला गेलो तर १२ टक्के जीएसटी असल्याचे सांगण्यात आले . दुसरीकडे, हिरे खरेदी करणाऱ्या रईस लोकांसाठी केवळ १.५ टक्के इतकी कमी जीएसटी आहे . अशा स्थितीत केंद्र किंवा राज्याचे सरकार कोणाच्या हिताचा विचार करते?

या गावदौऱ्यात वच्छला नामक वयस्क महिलेने गावाकडच्या बोलीभाषेत वाढत्या महागाईवरून सरकारच्या नावाने बोटे मोडली . खाद्यतेल दीडशे रूपयाच्या वर गेले, घरगुती गॅस सिलेंडर, अन्नधान्य, किराणा आणि सर्वच बाबतीत प्रचंड महागाई वाढली आहे . लाडकी बहीण म्हणतेत आणि दीड हजार देतेत... पण, घर तर आमालेच चालवावे लागते ना... महागाईमुळे जगणे कठीण झाल्याचेही त्या म्हणाल्या.

दरम्यान, या परिसरातील रस्ते आणि इतर समस्या निकाली काढण्याची अपेक्षा अनेक नागरिकांनी व्यक्त केली . याप्रसंगी बेला येथील पुरस्कारप्राप्त सरपंच शारदा गायधने, तसेच अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात उमेदवार गेले की मतदार त्यांच्यासमक्ष केवळ महागाईचा पाढा वाचत असल्याचे दिसून येते. वाढती महागाई हा मुद्दा विरोधकांना आयताच मिळाला असून, यावरही ते भर देत आहेत.

## मोदींची सत्ता डगमगणार

### संजय राऊतांचे भाकित

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. १४ :

भारतीय जनता पक्ष जाहिरातीवर तरलेला पक्ष आहे. जाहिरातीवरच पैसा खर्च करून 2014 मध्ये नरेंद्र मोदी सत्तेवर आले आहेत. 2014 मध्ये त्यांनी ब्लॅक अँड व्हाईट जाहिराती केल्या होत्या. आता दहा वर्षानंतरची परिस्थिती पाहिली तर नरेंद्र मोदी यांनी या देशांमध्ये फार मोठी क्रांती केलेली दिसत नाही. किंवा नवीन आधुनिक हिंदुस्तान घडवला असे कधीही दिसले नाही. किंबहुना आहे तो भारत देश सुद्धा त्यांनी मागे ओढला, असा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, नरसिंहराव, मनमोहन सिंग, राजीव गांधी अशा पंतप्रधानांच्या नेतृत्वात हा देश घडला. त्यामध्ये नरेंद्र मोदी यांनी काय केले? याची जर त्यांनी एकदा उजळणी आम्हाला करायला दिली तर बरे होईल. असे म्हणत संजय राऊत यांनी मोदींवर निशाणा साधला आहे. नरेंद्र मोदी शिवतीर्थावर सभा घेत आहेत.

शिवतीर्थावर बाळासाहेब ठाकरे यांची समाधी आहे. त्या समाधीला स्मरुन मोदींनी सांगावे की, महाराष्ट्र तोडण्यासाठी, मुंबईचे महत्व कमी करण्यासाठी त्यांनी शिवसेना फोडली की नाही. हे त्यांनी छातीवर हात ठेवून सांगावे. असे म्हणत राऊत यांनी मोदींना आव्हान दिले आहे.




महासागर
नागपूर
# वृत्तसागर
■ शुक्रवार, दि. १५, नोव्हेंबर २०२४ ■

# १० टक्के व्याजाचे आमिष दाखवून १.८५ कोटींचा चुना

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :

गुंतवणुकीवर 10 टक्के व्याजाचे आमिष दाखवून एका ठकबाजाने नंदनवनच्या जुना बगडगंज परिसरात राहणाऱ्या शेकडो लोकांना 1 कोटी 85 लाखांचा चुना लावला आणि दुकान व घरसोडून कुटुंबासह फरार झाला. किशोर प्रभाकर अमृतकर (45) रा. वृंदावननगर असे फरार आरोपीचे नाव आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक कोळी यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत किशोरविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्याचा शोध घेण्यासाठी एक पथक तयार करण्यात आले आहे. सध्या पीडित ग्राहकांची संख्या 346 असून ही संख्या अडीच हजारांवर जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

किशोर गत 20 वर्षांपासून जुना बगडगंज परिसरात प्रभाव जनरल स्टोअर नावाने दुकान चालवत होता. स्थानिक नागरिकांचे त्याच्या दुकानात येणे-जाणे होते. तो दुकानातून भीसीही चालवित होता. जानेवारी 2022 मध्ये त्याने नवीन योजना सुरू केली. तो लोकांना आरडीप्रमाणे पैसे गुंतवायला लावत होता आणि गुंतवलेल्या रकमेवर दरवर्षी 10 टक्के दराने व्याजही देत होता. दिवाळीत तो ग्राहकांना त्यांची रक्कम परत करीत असल्याने नागरिकांचा विश्वास बसला होता. सामान्य आणि मध्यमवर्गीय कुटुंबांनी त्याच्याकडे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली होती. गंगाबाई घाट, हिवरीनगर, जगनाडे चौक, श्रीकृष्णनगर, बगडगंज, नंदनवन आदी परिसरातील जवळपास अडीच हजार लोकांनी त्याच्याकडे गुंतवणूक केल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. मागील अनेक वर्षांपासून वेळेवर व्याजासह रक्कम परत करीत असल्याने त्याच्यावर संशय घेण्याचे कुठलेच कारण नव्हते.

मात्र, या दिवाळीला त्याने पीडित ग्राहकांना रक्कम परत केली नाही. ग्राहकांनी त्याच्याकडे पैशांसाठी तगादा सुरू केला. तो आलेल्या ग्राहकांची समजूत घालत होता. अचानक 15 दिवसांपूर्वी तो कुटुंबीयांसह अचानक फरार झाला. त्याच्या घरी कुलूप असल्याची माहिती परिसरात पसरताच नागरिकांची प्रचंड गर्दी जमली. शेकडो लोकांचा जत्था पोलिस ठाण्यात पोहोचला. पोलिसांनी फियार्दीच्या तक्रारीवरून किशोरविरुद्ध कलम 318 (4) अन्वये फसवणुकीचा गुन्हा नोंदविला आहे.

## दुकान आणि घरसोडून पळाला आरोपी

### अडीच हजार लोकांकडून गुंतवणुकीचा अंदाज

किशोरला पत्नी आणि एक लहान मुलगा आहे. त्याचे दुमजली घर आहे. तो जनरल स्टोअर्स चालवतो. लोकांकडून घेतलेली रक्कम कुठे गुंतवत होता याबद्दल नागरिकांना कोणतीही माहिती नाही. मात्र, तो वेळेवर पैसे देत असल्याने लोक त्याच्याशी जुळत गेले. त्याच्याकडे कमितकमी अडीच हजार लोकांनी पैसे गुंतविले असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिस प्रकरणाचा सखोल तपास करीत आहेत.

# कोट्यवधींची रोकड आयकरच्या ताब्यात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

बुधवारी रात्री तहसील पोलिसांनी गोपनिय माहितीवरून शाकीर खान (42) रा. टिपू सुलतान चौक, यशोधरानगर याला 1 कोटी 35 लाखांची रोकड घेऊन जाताना पकडले होते. चौकशीत तो रकमेबाबत समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. त्यामुळे पोलिसांनी रोकड जप्त करून शाकीरला ताब्यात घेतले.

मोठी रक्कम असल्याने घटनेबाबत आयकर विभागालाही सूचना देण्यात आली. गुरूवारी आयकर विभागाचे पथक तहसील ठाण्यात पोहोचले. शाकीरची चौकशी केली, मात्र तो उडवा-उडवीची उत्तरे देत आहे. आयकर विभागाने संपूर्ण रक्कम ताब्यात घेतली असून सध्या शाकीरला सूचनापत्र देऊन सोडण्यात आले आहे. निवडणुकीच्या काळात इतकी मोठी रक्कम मिळाल्याने शहरात विविध चर्चांना उत आला आहे.



पोलिस सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार शाकीरने बुधवारी रात्री 10 वाजताच्या सुमारास सदर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून 1 कोटी 35 लाख रुपये घेतले. एका पांढऱ्या रंगाच्या पिशवीत पाचशेच्या चलनी नोटा असलेले बंडल ठेवून तो दुचाकीने निघाला. रक्कम कुठे पोहोचवायची यासंदर्भात त्याला दिशानिर्देश मिळणार होते.

### शाकीरला सूचना पत्र देऊन सोडले

मात्र, विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी सर्व अधिकाऱ्यांना कारवाई तसेच बारीक लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले आहे. वपोनि संदीप बुवा यांच्या पथकाने ठिकठिकाणी पेरलेल्या खबऱ्यांकडून शाकीरबाबत गोपनिय माहिती मिळाली. पोलिसांनी सापळा रचून केतेश्वर चौकात त्याला अडविले. झडतीमध्ये त्याच्याजवळ 1.35 कोटीची रोकड मिळाली.

पोलिसांनी रकमेबाबत त्याची सखोल चौकशी केली. मात्र, त्याच्याकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही. शिवाय शाकीरने रकमेसंदर्भात कुठलाच ठोस पुरावा किंवा कागदपत्रेही सादर केली नाही. 10 लाखांच्यावर रक्कम असल्याने पोलिसांनी आयकर विभागाला माहिती दिली. आयकरचे पथक गुरूवारी ठाण्यात पोहोचले. घटनास्थळी पंचनामा करून संपूर्ण रक्कम ताब्यात घेतली. ती रक्कम कोणाची आहे आणि शाकीर कोणाला पोहोचविण्यासाठी जात होता? याचा आयकर विभागाकडून तपास केला जात आहे. तसेच तहसील पोलिसही या प्रकरणाच्या मुळापर्यंत जाण्याच्या तयारीत आहेत. सध्या संपूर्ण रक्कम ट्रेझरीत ठेवण्यात आली आहे.

# रस्ते अपघातात दोन मजुरांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :

शहरात वेगवेगळ्या भागात घडलेल्या रस्ते अपघातांमध्ये दोन मजुरांचा मृत्यू झाला. पहिली घटना गणेशपेठ पोलिस ठाण्यांतर्गत राम झुल्याजवळ घडली. गणेशकुमार महादेव मंडल (20) रा. मधुबनी, बिहार असे मृताचे नाव आहे.

गणेश मजुरीसाठी नागपुरात आला होता. गत 10 नोव्हेंबरच्या रात्री 9 वाजताच्या सुमारास गणेश रामझुल्याजवळून पायदळ जात होता. राम मंदिरसमोर भरधाव असलेल्या दुचाकी वाहनाच्या चालकाने त्याला जबर धडक दिली आणि पळून गेला.

आसपासच्या नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेत गणेशला उपचारार्थ मेयो रुग्णालयात भरती करण्यात आले. बुधवारी सायंकाळी उपचारादरम्यान गणेशचा मृत्यू झाला. पोलिसांनी गणेशचे वडील महादेव यांच्या तक्रारीवरून अज्ञात दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

अपघाताची दुसरी घटना जुनी कामठी ठाण्यांतर्गत घडली. ट्रक चालकाच्या निष्काळजी पणामुळे एका मजुराचा जीव गेला. मोहम्मद दुरूद आलम दौलत शेख (22) रा. साहेबगंज, झारखंड असे मृताचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळी दुरूद हा कामठी मार्गावरील हॉटेल ईडन ग्रीन्जमध्ये ट्रकमधून डेकोरेशनचे सामान खाली उतरवत होता. दरम्यान ट्रक क्र. एमएच-22/एएन-2017 च्या चालकाने निष्काळजीपणे वाहन पुढे करून गेटच्या पिल्लरला धडक दिली. पिल्लर आणि ट्रकमध्ये दबल्याने दुरूद गंभीर जखमी झाला. त्याला उपचारार्थ जवळच्या रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पोलिसांनी आरोपी ट्रक चालक अमरजीत उर्फ हॅपीसिंग खैरा (24) रा बाबादीपसिंगनगर विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून त्याला अटक केली.

## गॅलरीतून खाली पडल्याने चिमुकलीचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :

एका 4 वर्षांची चिमुकली खेळता-खेळता गॅलरीतून खाली पडली. रुग्णालयात उपचारा दरम्यान तिचा मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना एमआयडीसी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. छोटी अरविंद मंडल रा. विद्यापतीनगर, टॉवर लाईन रोड असे मृत चिमुकलीचे नाव आहे.

गत 11 नोव्हेंबरला सकाळी 11 वाजताच्या सुमारास छोटी पहिल्या माळ्यावरील तिच्या घरी गॅलरीत खेळत होती. खेळताना ती गॅलरीवर चढण्याचा प्रयत्न करीत होती. या दरम्यान तोल गेल्याने ती खाली पडली. गंभीर जखमी अवस्थेत कुटुंबीयांनी तिला उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात भरती केले. उपचारादरम्यान छोटीचा मृत्यू झाला. पोलिसांनी या प्रकरणी मिळालेल्या सूचनेवरून अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. या घटनेने परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# मतदान जनजागृती बाईक रॅली रविवारी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :

भारतीय संविधानाने १८ वर्षावरील प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला आहे. मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे, तरी देखील नागरिक मतदानासाठी उदासीन दिसून येतात अशात नागरिकांना मतदानासंदर्भात जागृत करण्यासाठी नागपूर महानगरपलिकेच्या वतीने स्वीप कार्यक्रमात रविवारी 17 नोव्हेंबर रोजी सकाळी 9.30 वाजता मतदान जनजागृती बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येत बाईक रॅलीत सहभाग नोंदवित मतदानाचा जागर करावा असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

बाईक रॅली कार्यक्रमात नागपूर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, नागपूर पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, नागपूर जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल, अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा गौरकर, मनपाच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.कपील कलोडे, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती पल्लवी धात्रक, मनपाचे क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर यांच्यासह मनपा, जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

रविवार 17 नोव्हेंबर रोजी सकाळी 9.30 वाजता नागपूर महानगरपालिका मुख्यालय, सिव्हिल लाईन्स येथून रॅलीला सुरुवात होईल. पुढे व्हीसीए चौक- जिल्हाधिकारी कार्यालय- आकाशवाणी चौक- जी.पी.ओ. चौक-जिल्हापरिषद कार्यालय- पोलीस आयुक्त कार्यालय -लेडिज क्लब चौक- जी.एस.कॉलेज चौक- शंकरनगर चौक- झाशी राणी चौक-लोहापुल नवीन अंडर पास उजवी कडे- मोक्ष धाम चौक- जाटतरोडी (रामबाग) - मेडिकल चौक -क्रीडा चौक- सोमवारी कॉर्टर- सक्करदरा चौक- मंगलमूर्ती लॉन चौक- जगनाडे चौक-गंगाबाई घाट चौक-टेलिफोन एक्सचेंज चौक- सी. ए. रोड- मेयो हॉस्पिटल चौक- एल.आय.सी.चौक- कडबी चौक-कडबी चौक पुलिया- छावणी-सदर होत मनपा मुख्य कार्यालय येथे रॅलीचे समापन होईल. तरी नागरिकांनी मोठ्यासंख्येत उपस्थित राहावे असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आकाशात झेपावलेल्या विमानात बॉम्ब ठेवल्याचा फोन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :

नागपूरहून कोलकाताच्या दिशेने झेपावलेल्या विमानात बॉम्ब ठेवण्यात आल्याचा फोन विमानतळ अधिकाऱ्यांना आल्याने तातडीने विमान रायपूरला उतरवण्यात आले. विमानात बॉम्ब असल्याचे समजाच प्रवाशांची एकच तारांबळ उडाली. विमानात १५० प्रवाशी प्रवासी होते. अलिकडे देशात विमानात बॉम्ब ठेवल्याचे ई-मेल आणि फोन येण्याचे प्रमाण वाढले आहे. सुरक्षा यंत्रणावर दडपण वाढले आहे. इंडिगो कंपनीच्या एका विमानामध्ये अशाच प्रकारे बॉम्ब ठेवल्याची धमकी मिळाली. त्यामुळे एकच खळबळ उडाली. नागपूरवरून कोलकाताला जाणाऱ्या विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाली.

बॉम्बने विमान उडवण्याची धमकी मिळताच एकाच खळबळ उडाली. प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. वैमानिकाला याबाबत कळवण्यात आले.

त्याने विमान रायपूरकडे वळते केले. येथे विमान उतरताच प्रवाशांना बाहेर काढण्यात आले. विमानांची तपासणी केली गेली. तसेच ही धमकी कुठून आली याबाबत चौकशी देखील केली जात आहे. सीआयएसएफ आणि रायपूर पोलिसांच्या पथकाने तपासणी सुरु केली आहे.

जगदीश उईके या नावाच्या व्यक्तीस काही दिवसांपूर्वी नागपूर पोलिसांनी अटक केली होती. त्याच्यावर देशभरातील विमानतळ बॉम्बने उडवण्याची धमकी देण्याच आरोप आहे.

त्याची चौकशी करण्यात आली. तो दिशाभूल करत असणारी माहिती दिल्याचे नागपूर पोलिसांचे म्हणणे आहे. एनआयए, आयबी, एटीएसकडून त्याची चौकशी केली जाणार आहे. त्यानंतर तपास केला असता तो तरुण खोटे बोलत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे विमानाचे उड्डाण करण्यास विलंब झाला.

# शेटजी-भटजीच्या पक्षाला ओबीसी नेत्यांनी मोठे केले : नाना पटोले

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :

एकेकाळी भाजप शेटजी-भटजींचा पक्ष म्हणून ओळखला जात होता. ओबीसी समाजातील नेत्यांनी या पक्षाला मोठे केले. आता त्याच ओबीसींना भाजपचे लोक अपशब्द बोलून अपमानित करत आहेत.

त्यामुळे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी अपमान सहन करण्यापेक्षा भाजप सोडावे, असे आवाहन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले. ते गुरुवारी नागपुरात पत्रकारांशी बोलत होते.



पटोले म्हणाले, मला बावनकुळे यांना सांगायचे आहे की, ज्या भाजपमध्ये ते आहेत त्या पक्षाचे लोक ओबीसी समाजाला श्वान म्हणत असतील तर त्यांनी भाजपमधून बाहेर पडले पाहिजे. त्या पक्षात तुम्ही गप्प बसले असाल तर समाजाचा अपमान करण्यासाठी तुम्ही तिथे बसला आहात, असा त्याचा अर्थ होतो. नाना पटोले समोरून लढतो, मागून वार करत नाही म्हणून जे आवाहन मी केले त्यावर बावनकुळेंनी कृती करावी, असेही पटोले म्हणाले.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि माज्याही हेलिकॉप्टरची काल दोन वेळा तपासणी केली गेली. माज्याजवळ बॅगच नाही तर काय मिळेल? निवडणूक आयोगाला जे करायचे आहे ते ठीक आहे. पण, आमची मागणी आहे की मोदी, शाह आणि योगींच्या हेलिकॉप्टरमधील बॅगचीही तपासणी व्हायला हवी.

# सोन्याच्या दरात घसरण

**नागपूर** : दिवाळीत उच्चांकीवर असलेले सोन्याचे दर आता झपाट्याने खाली येत आहे. नागपुरात यंदाच्या धनत्रयोदशीला बाजार उघडल्यावर सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७९ हजार २०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७३ हजार ७०० रुपये, १८ कॅरेटसाठी ६१ हजार ८०० रुपये, १४ कॅरेटसाठी ५१ हजार ५०० रुपये नोंदवले गेले. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी हे दर आणखी वाढून २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७९ हजार ४०० रुपयेपर्यंत गेले. नागपुरात ६ नोव्हेंबरला बाजार उघडल्यावर सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७९ हजार रुपये, २२ कॅरेटसाठी ७३ हजार ५०० रुपये, १८ कॅरेटसाठी ६१ हजार ६०० रुपये, १४ कॅरेटसाठी ५१ हजार ४०० रुपये होते. हे दर (१४ नोव्हेंबर) २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७४ हजार ५०० रुपये, २२ कॅरेटसाठी ६९ हजार ३०० रुपये, १८ कॅरेटसाठी ५८ हजार १०० रुपये, १४ कॅरेटसाठी ४८ हजार ४०० रुपये नोंदवले गेले. त्यामुळे सोन्याच्या दरात १४ नोव्हेंबरला २४ कॅरेटमध्ये ४,५०० रुपये, २२ कॅरेटमध्ये ४,२००, १८ कॅरेटमध्ये ३,५०० , १४ कॅरेटमध्ये ३ हजार रुपये प्रति दहा ग्राम घट झाली आहे.




नागपूर : ८५ वर्षावरील वृध्दांचे त्यांच्या घरी जाऊन मतदान करवून घेण्याच्या प्रक्रियेत निवडणूक विभागाने टेकडी रोड, सिताबर्डी, नागपूर येथिल कमलादेवी प्रेमनारायण मंत्री यांच्या निवासस्थानी जाऊन मतदान करवून घेतले.

## संगीता रामटेके बनल्या स्वच्छता दूत पुरस्काराच्या मानकरी

# फुटपाथवर सुरू केला रद्दी विकण्याचा व्यवसाय

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

पती निधनानंतर पती व सासरे यांचा रद्दी विकण्याचा परंपरागत व्यवसाय ओघानेच करू लागलेल्या संगीता रामटेके यांनी या व्यवसायाची सुरुवात प्रथमतः फुटपाथ वर छोटेसे दुकान टाकून केली पण कित्येक वेळेला अतिक्रमणाच्या नावाखाली फुटपाथवरून हाकलून देण्यात येत तर जागेच्या टंचाईने मालाच्या दर्जावर परिणाम होऊन मालाला योग्य भाव मिळत नसे. अशा या प्रवासात ईश्वराप्रमाणे स्वच्छ असोसिएशनचे सहाय्य लाभले व रद्दिवाली बाई म्हणून ओळख असलेल्या संगीता रामटेके यांनी दिल्लीच्या स्वच्छता दूत पुरस्कारापर्यंत मजल मारली.

नववा वर्ग शिकलेल्या व पती निधनानंतर आपल्या दोन मुलांचा सांभाळ करणे व कुटुंब चालवण्यासाठी संगीता रामटेके या आपला कौटुंबिक रद्दी विकण्याचा व्यवसाय करू लागल्या. सुरुवातीला त्यांनी हा व्यवसाय फुटपाथवर सुरू केला. आलेला सुका



कचरा व रद्दी मोजण्याचे माप असा त्यांचा दुकानाचा थाट होता. प्रत्येक वेळेला अतिक्रमणाच्या कारवाईमुळे त्यांना आपल्या दुकानाचा बोराबीस्तरा गुंडाळावा लागायचा तसेच जागेच्या अभावामुळे गुणात्मक माल मिळत नसल्याने त्याचा विक्रीवर परिणाम व्हायचा.

असा एकंदरीत उपजीविकेचा प्रवाह सुरू असताना स्वच्छ असोसिएशनच्या अनुसया काळे या त्यांच्या मदतीला देवासारख्या आल्या. त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनातून व आधारातून संगीता रामटेके यांनी 2018 मध्ये सावित्री महिला बचत गटामार्फत मटेरियल रिकवरी फॅसिलिटी (एम. आर. एफ.) सेंटर सुरू केले.

स्वच्छ असोसिएशनचा असलेला भक्कम जनसंपर्क त्यांच्या कामी आला व लोक त्यांच्याशी जुळले गेले. केवळ फोनवर लोक त्यांच्या धरमपेठ झोन क्रमांक दोन येथे सुरू असलेल्या एम.आर.एफ. सेंटरवर सूका कचरा विकतात व या कचऱ्याचे वर्गीकरण करून जास्त भाव देणाऱ्या विक्रेत्याकडे विक्री केल्या जाते. अशाप्रकारे हा व्यवसाय जोमाने सुरू झाला व मिळालेला नफा बचत गटांच्या महिलांमध्ये वाटप केल्या जातो.

बघता बघता त्या छोटे-मोठे दवाखाने, रेस्टॉरंट, अपार्टमेंट, छोटे मोठे दुकाने व शहरातील 25 शाळांशी त्या जुळल्या गेलेल्या आहेत. विकण्या लाइक रद्दी जमा झाली की रामटेके यांना कॉल करून बोलविण्यात येते व त्या रद्दी संकलनासाठी पिकअप वर जातात. ती रद्दी संकलित करून केंद्रात आणली जाते व जास्त भाव देणाऱ्या विक्रेत्यांना विकली जाते.

यातूनच त्या जयदीप देशमुख या पर्यावरणप्रेमीच्या संपर्कात आल्या. ते त्यांच्या संपकार्तील जवळपास पंचवीस शाळांमधून विविध प्रकारची कागदी रद्दी गोळा करून रामटेके यांना विकतात. अशा प्रकारे संगीता रामटेके यांचे कार्य शहरातील जागोजागी साचणारा कचरा कमी करण्यासोबतच बेरोजगार महिलांना हाताला काम देण्याची महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे.

नागपूर मनपाने सुरू केलेल्या शुभ दिवाळी स्वच्छ दिवाळी या अभियाना अंतर्गत संगीता रामटेके यांच्या एम.आर. एफ. सेंटरचे नामांतर रिडयूस रियूज रिसायकल म्हणजेच आर. आर. आर. सेंटर असे झाले आहे.

पुढे त्या म्हणतात की, आज रद्दी संकलन व विक्री या व्यवसायाला एक स्टॅंडर्ड प्राप्त झाले असून त्याचे महत्त्व लोकांना कळले आहे. त्यामुळेच त्यांना शाळा व महाविद्यालयामध्येही कचरा संबंधी मार्गदर्शनासाठी पाचारण करण्यात येते. ज्या एकेकाळी मनपाची अतिक्रमणाची गाडी आली की, त्या घाबरायच्या त्याच आता मनपा आयुक्तांशी चर्चा करतात. त्या जनतेला आवाहन करतात की केवळ मनपा प्रशासनावर विसंबून न राहता घरातील कचऱ्याचे वर्गीकरण हे जागेवरच झाले तर मनपावर भार पडणार नाही व शहर सुंदर करण्यास हातभार लागेल.

# १०० टक्के मतदानाचा संकल्प

## पुण्यातील वैदर्भियांसाठी २५ एसी गाड्यांची नि :शुल्क व्यवस्था

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

देशहितासाठी मतदान आणि शंभर टक्के मतदान याच्या प्रचारासाठी संपूर्ण देशात हजारो कार्यकर्ते काम करीत आहेत. आपापल्या भागात जास्तीत जास्त मतदान व्हावे, यासाठी अनेक उपक्रमही आखले जात आहेत. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी पुण्यातील वैदर्भीयांसाठी विदर्भ मित्र मंडळाने पुढाकार घेतला असून पुणे ते नागपूर अशी निःशुल्क व्यवस्था केली आहे.

यासाठी पुण्यात दिवाळी स्नेहमीलन कार्यक्रमाद्वारे जागृती करण्यात आली. सुमारे एक लाख पुणे निवासी नागपुरकरांशी संपर्क झाला आहे. १९ नोव्हेंबर रोजी पुण्यातून संगमवाडी बसस्थानकावरून निवडणूक स्पेशल स्लिपर कोच एसी बसेसने निघून बुधवार २० रोजी नागपुरात येणार आहे. आणि २० ला मतदान करून त्याच दिवशी परत नागपूरहुन निघून २१ ला पुण्यात परतणार असल्याचे बोरीकर यांनी सांगितले.



पुणे निवासी नागपूरकर युवकांना तसेच पुण्यातील विदर्भवासीयांना येत्या २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभेच्या मतदानासाठी बस सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

विदर्भ मित्र मंडळातर्फे ही सेवा उपलब्ध करून देण्यात येईल. भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असून प्रत्येक नागरिकाने मतदान करणे, हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. मतदानाने आपली लोकशाही अधिक सशक्त होते. देश हितासाठी मतदान करणे आवश्यक आहे, असे आवाहन विदर्भ मित्र मंडळातर्फे केले जात आहे.

यावेळेची विधानसभेची निवडणूक म्हणजे देशाचे नव्हे तर संपूर्ण विश्वाचे भवितव्य ठरविणारी असल्याने देशहितासाठी शंभर टक्के मतदान व्हावे तसेच धमार्धारित भेदभाव न करता एक सशक्त सरकार पुनश्च निवडून यावे यासाठी शंभर टक्के मतदान होणे गरजेचे आहे, त्यासाठी हा उपक्रम केला जात असल्याची माहिती विदर्भ मित्र मंडळाचे श्रीपाद बोरीकर यांनी दिली.

सर्व अडचणींवर मात करून नागरिकांनी लोकशाहीमध्ये मतदानाचा हक्क बजावावा असेही आवाहन विदर्भवासी पुणे निवासी, विदर्भ मित्र मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून पुण्यातील विदर्भवासीयांकडून उपक्रमाचे स्वागत होत आहे, असे बोरीकर यांनी सांगितले. पुण्यातून अशी व्यवस्था पहिल्यांदाच होत आहे. शंभर टक्के मतदानाचे आवाहन तर आम्ही नेहमीच करतो, पण यावेळी शंभर टक्के मतदान होण्यासाठी आम्ही इथे प्रत्यक्ष काम करीत आहोत. प्रतिसाद छान आहे. एकूण २५ बसगाड्यांचे नियोजन आहे.

# वाठोडा चार्जिंग स्टेशनची आयुक्तांनी केली पाहणी

## १५० बसेसच्या चार्जिंगची सुविधा सज्ज



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

नागपूर महानगरपालिकेच्या आपली बस सेवेतील ई-बसेससाठी वाठोडा येथे कार्यान्वित करण्यात आलेल्या चार्जिंग स्टेशनची मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी गुरूवारी (ता.१४) पाहणी केली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल, परिवहन व्यवस्थापक विजय जाधव, व्यवस्थापक प्रशासन विकास जोशी, व्यवस्थापक ऑपरेशन राजीव घाटोळे, पीएमआय इलेक्ट्रो मोबिलिटी सोल्यूशन प्रा.लि.चे अध्यक्ष सी.के. गोयल उपस्थित होते.

१५व्या वित्त आयोगातून पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेसाठी केंद्र शासनाकडून नागपूर महानगरपालिकेला १४४ नवीन ई-बस देण्यात आलेल्या आहेत. यापैकी ८६ बसेस आपली बस सेवेमध्ये तैनात आहेत. या बसेससाठी वाठोडा येथे १०.६ एकर जागेमध्ये डेपो आणि चार्जिंग स्टेशन तयार करण्यात आले आहे. या बसेसच्या संचालनाची जबाबदारी पीएमआय इलेक्ट्रो मोबिलिटी सोल्यूशन प्रा.लि. यांचेकडे देण्यात आली आहे.

पीएमआय मार्फत या जागेवर १५० बसेसच्या पार्कीगची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच चार्जीगसाठी २२ स्टेशन तयार करण्यात आले असून यावर एकावेळी ४४ बसेसची चार्जींग करण्याची सुविधा आहे. या संपूर्ण परिसराची मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी पाहणी केली.

वाठोडा डेपो आणि चार्जिंग स्टेशनमध्ये प्रकाश व्यवस्था करण्यात आली असून संपूर्ण परिसरामध्ये देखील प्रकाश व्यवस्था करणे, बसेसची सर्व्हिसींग करण्यासाठी निर्माण करण्यात येत असलेले बांधकाम, चालकांसाठी बसण्याचे शेड, पिण्याच्या पाण्याची व्यवस्थेचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले. पीएमआय इलेक्ट्रो मोबिलिटी सोल्यूशन प्रा.लि.द्वारे वाठोडा डेपो आणि चार्जिंग स्टेशनमध्ये सुविधांबाबत सुरू असलेल्या कामांबाबत आयुक्तांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी परिवहन विभागाचे स्थापत्य उपअभियंता केदार मिश्रा, यांत्रिकी अभियंता योगेश लुंगे, प्रकल्प सल्लागार मेहुल रानडे, पीएमआयचे उपाध्यक्ष प्रवीण श्रीवास्तव, वरिष्ठ व्यवस्थापक अमरदीप शर्मा, डेपो व्यवस्थापक अभिजीत नलावडे उपस्थित होते.

# एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना निकालाची प्रतिक्षा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या(एमपीएससी) वतीने अन्न सुरक्षा अधिकारी पदासाठी फेब्रुवारी २०२४ मध्ये मुख्य परीक्षा घेण्यात आली. मात्र, दहा महिन्यांचा कालावधी उलटूनही परीक्षेचा निकाल जाहीर न झाल्याने विद्यार्थ्यांची चिंता वाढली आहे. आयोगाकडून सातत्याने परीक्षा, निकालात होत असलेल्या विलंबामुळे विद्यार्थी मानसिक तणावात आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने फेब्रुवारी-२०२३ रोजी अन्न व औषध प्रशासन सेवेतील अन्न सुरक्षा अधिकारी (गट ब) पदाबाबत जाहिरात काढली. जाहिरातीनंतर अन्न सुरक्षा अधिकारी पदाबाबत शैक्षणिक अर्हतेचा गोंधळ निर्माण झाला होता. हे प्रकरण प्रशासकीय न्याय प्राधिकरणाकडे (मॅट) गेले होते. त्यानंतर ५ जून २०२३ मध्ये उमेदवारांची पूर्व परीक्षा घेण्यात आली.

या परीक्षेचा निकाल १५ सप्टेंबर २०२३ ला जाहीर झाला. त्यानंतर पात्र उमेदवारांकडून मुख्य परीक्षेसाठी अर्ज प्रक्रिया पार पडली असून १० फेब्रुवारी २०२४ रोजी मुख्य परीक्षा घेण्यात आली. मुख्य परीक्षेला होऊन दहा महिन्यांचा कालावधी झाला आहे. मात्र, असे असतानाही अद्याप परीक्षेचा निकाल जाहीर झालेला नाही. यामुळे विद्यार्थ्यांची चिंता वाढली असून लवकर निकाल जाहीर करावा अशी मागणी होत आहे.

परीक्षार्थींनी आयोगाकडे संबधित परिक्षेच्या निकलाबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडून योग्य उत्तर मिळत नसल्याचा आरोप आहे. निकालाच्या विलंबाबाबत आयोगाकडून अद्याप प्रसिद्धी पत्रकाद्वारे महिती देण्याची तसदीही घेतली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात परिक्षेबद्दल संभ्रम निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांना आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. या त्रासात काही अनुचित प्रकार घडल्यास जबाबदार कोण? असा प्रश्नही आता उमेदवार उपस्थित करत आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने फेब्रुवारी-२०२३ रोजी अन्न व औषध प्रशासन सेवेतील अन्न सुरक्षा अधिकारी (गट ब) पदाबाबत जाहिरात काढली. त्यात शैक्षणिक अर्हता फूड टेक्नॉलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, ऑईल टेक्नॉलॉजी, कृषी विज्ञान, पशुवैद्यकीय विज्ञान, जैव रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, रसायनशास्त्र यापैकी एक वा मान्यताप्राप्त विद्यापीठातून औषध शास्त्रात पदवी किंवा पदव्युत्तर अशी नमूद आहे.

अर्हतेत बीएएमएसचा समावेश नव्हता. या पदांसाठी ऑनलाईन अर्ज भरताना बीएएमएस उमेदवारांना विकल्प नसल्याचे कळल्यावर हे उमेदवार प्रशासकीय न्याय प्राधिकरणाकडे (मॅट) गेले होते. मॅटने तूर्तास आयोगाला बीएएमएस उमेदवारांनाही अर्ज भरण्याचा विकल्प देण्याचे आदेश दिल्यावर बीएएमएस उमेदवारांनी अर्ज भरले. मॅटमध्ये या प्रकरणाची १३ सप्टेंबरला सुनावणी झाली.

# आदिवासी विकास परिषदेच्या वतीने साजरी करण्यात येणार भगवान बिरसा मुंडा यांची जयंती

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :




अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद विदर्भ विभाग द्वारा दिनांक 15 नोव्हेंबर 2024 रोजी क्रांतीसुर्य, महामानव भगवान बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जन्म जयंती निमित्त बिरसा मुंडा पुतळा अंबाझरी टेकडी नागपूर येथे सकाळी 9.00 वाजता पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येईल. त्या प्रसंगी उपस्थितीत दर्शवावी असे आवाहन संस्थेचे पदाधिकारी कृष्णराव परतीके, सुर्यकांत उईके, दिनेश शेराम, राहुल मसराम, विजय परतीके, स्वप्निल मसराम,राहुल मडावी, सुरेंद्र नैताम, यशवंत मसराम,प्रमोद उईके, विनय उईके, शाम कोडपे,राम कोडापे, राजेश उईके, शाम सराटे आणि सर्व अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे पदाधिकारी कार्यक्रमा प्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## सावनेर,कळमेश्वर मतदार संघाचे उमेदवार

# घनश्याम निखाडे प्रचाराच्या मैदानात

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तरुण तडफदार नेतृत्व घनश्याम निखाडे सावनेर व कळमेश्वर विधानसभा क्षेत्राचे नवा चेहरा दिसत असला तरी आतापर्यंत जनतेच्या अनेक आरोग्य शिक्षण आणि विविध प्रकारच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव तत्पर राहून अनेक दिवसांपासून जनतेच्या मनात घर करुन बसले आहेत.



त्याचबरोबर सावनेर व कळमेश्वर तालुक्यातील मनसे उमदेवार पहिल्यादा प्रचार दौरावर असतांना अनेक समाजबांधव विविध प्रकारच्या संघटना यांचे उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या बरोबरच धापेवाडा भड़ानगी, सोनपुर, खानगांव, कळमेश्वर, ढालगांव, खैरी, सेलु आणि संपूर्ण मतदार संघ पिंजून काढत आहेत.

गोरगरीब जनतेसाठी सदैव तत्पर राहून सावनेर व कळमेश्वर विधानसभा मतदार संघाचे उमेदवार घनश्याम निखाडे यांच्या झंझावाती प्रचार दौराला जोरदार सुर्वात झाली असून अनेक ठिकाणी भेट घेऊन मतदार संघातील सर्वसामान्य गोरगरीबांच्या समस्या जाणून घेत जनतेपासून तर सगळ्यांपर्यंत पोहोचून सर्वच मतदार बंधु भगिणीचे आशीर्वाद घेऊन जास्तीत जास्त मतदारांचे पर्यंत पोहचून सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावून त्यांना योग्य न्याय मिळवून देण्यासाठी कंबर कसून घनश्याम निखाडे मैदानात उतरले आहेत. त्यावेळी उपस्थित योगेंद्र चटप, बाबा निखाड़े, टापरे, धीरज दवाले, दुर्गेश दिवाकर, हरिश हिंगणेकर आणि इतर कार्यकर्त मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

## सुरक्षा मोहिमेअंतर्गत रेल्वे मार्गाची पाहणी

**नागपूर :** रेल्वेतर्फे राबविण्यात येत असलेल्या सुरक्षा मोहिमेअंतर्गत विभागीय रेल्वे व्यवस्थापक नमिता यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी रेल्वे स्टेशन आणि डोंगरगड रेल्वे मागार्ची पाहणी केली. तपासणीदरम्यान ट्रॅकची देखभाल, सिग्नलिंग यंत्रणा, सुरक्षा प्रक्रिया आणि इतर कामांचा आढावा घेतला. याशिवाय, तपासणीत गुंतलेल्या ऑन-ड्युटी कर्मचाऱ्यांची तत्परता आणि कार्यक्षमतेचे मूल्यांकन करण्याकडे अधिक लक्ष देण्याचे आवाहन करण्यात रेल्वेच्या या सुरक्षा मोहिमेत वरिष्ठ अधिकाऱ्यांना मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या. रेल्वे क्रॉसिंगच्या एकूण कार्यक्षमतेचे मूल्यांकन करण्याकडे देखील लक्ष दिले पाहिजे.

# समीर स्टायलोवर आणखी एक गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

इंस्टाग्रामवर वादग्रस्त रील बनविण्यासाठी चर्चित समीर स्टायलो उर्फ समीर खान विरुद्ध आणखी एक गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणात अंबाझरी पोलिसांनी त्याला अटकही केली आहे.

गत सोमवारच्या रात्री लष्करीबाग परिसरात राहणारा अब्दुल इकराम नावाचा तरुण फुटाळा तलाव परिसरात फिरायला गेला होता. या दरम्यान समीरही एक तरुणी आणि दोन मित्रांसह लग्झरी कारने तेथे व्हीडिओ बनविण्यासाठी आला होता.

कोणताही वाद नसताना समीरने ओव्हरटेक करीत अब्दुलला शिविगाळ केली. यावरून दोघांमध्ये बाचाबाची झाली. समीर त्याला आपले नाव सांगून धमकावू लागला. अब्दुलने त्याच्याकडे दुर्लक्ष केले आणि पुढे निघाला. मात्र समीरने त्याला पुन्हा थांबवले. चाकू काढून मारण्याची धमकी दिली. अब्दुलने घटनेची माहिती अंबाझरी पोलिसांना दिली.

अंबाझरी पोलिसांनी समीरविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला. तहसील पोलिसांच्या मदतीने त्याला ताब्यात घेतले. समीरविरुद्ध यापूवीर्ही कारवाई करण्यात आली आहे. त्याच्याविरुद्ध विनयभंग, धमकावणे, आयटी ॲक्ट आणि पोक्सो ॲक्ट अनव्ये पूवीर्ही गुन्हेही नोंद झाले आहेत.

# एमकेएम डिफेंडर्सने पटकावले विजेतपद

## व्हीडीएल फ्लायर्स उपविजेता, एमकेएम खो-खो प्रिमियर लीग २०२४

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

महाराष्ट्र क्रीडा मंडळाद्वारे नागपुरात पहिल्यांदाच आयोजित करण्यात तीन दिवसीय ह्यएमकेएम खो-खो प्रिमियर लीग-2024 स्पर्धेची अंतिम फेरी अत्यंत अटीतटीची झाली. सलग चार सामने जिंकून थेट अंतिमफेरीत दाखल झालेल्या व्हीडीएल फ्लायर्सवर एमकेएम डिफेंडर्स संघाने अत्यंत चुरशीच्या झालेल्या साखळी व अंतिम सामन्यात सलग मात करीत विजेतपदावर आपले नाव कोरले.




त्यामुळे व्हीडीएल फ्लायर्सला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. इंग्लिश हायस्कूल, कॉंग्रेस नगर येथील मैदानावर फ्लड लाईटमध्ये तीन दिवस खो-खो प्रिमियर लीग 2024 चे सामने रंगले. तिस-या व अंतिम दिवशी सर्व संघांचे साखळी सामने पार पडले. त्यात एमकेएम डिफेंडर्सने व्हीडीएल फ्लायर्सला हरवत त्यांची विजयाची घोडदौड रोखली आणि सर्वाधिक 13 गुण प्राप्त केले. त्यामुळे अंतिम सामना एमकेएम डिफेंडर्स आधीच अंतीमफेरीत पोहोचलेल्या व्हीडीएल फ्लायर्स यांच्यात झाला.

एमकेएम डिफेंडर्सच्या खेळाडूंनी अतिशय उत्कृष्ट खेळी करत व्हीडीएल फ्लायर्सचा 4 गुणांनी पराभव केला आणि पहिला-वहिला खो-खो प्रिमियर लीग चषक आपल्या नावे केला.

तिस-या व चौथ्या स्थानासाठी राजमुद्रा वॉरियर्स व स्पोर्टस कर्मा यांच्यात लढत झाली. त्यात स्पोर्टस कमार्ने राजमुद्रा वॉरियर्सचा 4 गुणांनी करीत तिसरे स्थान पटकावले तर राजमुद्रा वॉरियर्सला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले. एमकेएम खो-खो प्रिमियर लीग 2024 स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमाला कॅलडरीचे एशिया पॅसिफिक मार्केटिंग हेड साहिल सुराना, उद्योजक पराग सराफ, महाराष्ट्र क्रीडा मंडळाचे अध्यक्ष सुमंत चितळे, कार्यकारी उपाध्यक्ष डॉ. विजय दातारकर, सचिव डॉ. पद्माकर सहसचिव डॉ. संजय चौधरी, सचिन देशमुख,वैभव कुमरे यांची उपस्थिती होती. प्रवीण खंगार यांनी भविष्यातील स्पर्धांच्या आयोजनासाठी तीन लाख रुपयांचा धनादेश प्रदान केला. मान्यवरांच्या हस्ते स्पधेर्तील प्रथम तीन विजेत्यांना चषक, वैयक्तिक सुवर्ण, रजत व कास्य पदके तसेच बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पद्माकर चारमोडे यांनी केले. पुढील वर्षी दिवाळीमध्ये 17 चे सामने खेळवले जातील, असे ते म्हणाले. महत्त्वपूर्ण योगदान : माजी राष्ट्रीय खेळाडू अश्फाख शेख, प्रशांत खळतकर, मनोहर दीक्षित, राजेश तुमसरे, सुधीर चिटणीस व चंद्रकांत आसोले यांनी मेंटॉर तर भूषण दहासहस्त्र, योगेश घुघूसकर, मनोज गोटेकर, नीतेश पारधे, पंकज सौरभ दुबे यांनी प्रशिक्षक म्हणून काम पाहिले. चेतन दोनाडकर, वंश शेंडे, प्रवीण वहाले, चेतन उके, प्रेम राखडे व यश वानखेड़े हे सहायक प्रशिक्षक होते.

या स्पर्धेच्या यशस्वीतेकरिता मंडळाचे अध्यक्ष सुमंत चितळे, सचिव डॉ. पद्माकर चारमोडे यांच्या मार्गदर्शनात डॉ. संजय चौधरी, सचिन देशमुख, वैभव कुमरे, समीर चिटणीस, शशांक बोकारे, समीर डॉ. राजु राऊत, सुधीर चिटणीस, डॉ. अतुल कुलकर्णी, साहिल नागपूरे यांचे सहकार्य लाभले.

स्पर्धेचा निकाल : प्रथम विजेता - एमकेएम डिंडर्स, द्वितीय विजेता- व्हीडीएल फ्लायर्स, तृतीय विजेता स्पोर्टस कर्मा

वैयक्तिक पारितोषिके : उत्कृष्ट आक्रमक खेळाडूः भाविक बघेल (एमकेएम डिफेंडर्स) (रु. 10000/-) उत्कृष्ट संरक्षकः सुमित शनिचरे (व्हीडीएल फ्लायर्स) (रु. 10000/-) अष्टपैलू खेळाडू (मुले)ः गितांशू सुर्यवंशी (राजमुद्रा वॉरियर्स) (रु. 11000/-) अष्टपैलू खेळाडू (मुली)ः अक्षरा किरंगे (व्हीडीएल फ्लायर्स) (रु. 10000/-) एमकेएम डिफेंडर्स व्हीडीएल फ्लायर्स उपविजेता एमकेएम खो-खो प्रिमियर लीग

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ७९ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 51 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. गुरूवार (14) रोजी शोध पथकाने 79 प्रकरणांची नोंद करून 52,000/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 19 प्रकरणांची नोंद करून 7,600/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे (रु. 100/- दंड) या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 100/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 3 प्रकरणांची नोंद करून 1,200/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 21 प्रकरणांची नोंद करून 26,500/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी जनावरे बांधणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000 रुपयांची वसुली करण्यात आली. रस्ता, फुटपाथ मोकळी जागा अशा ठिकाणी वाहणे जनावरे धुवून परिसर अस्वच्छ करणे अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000/ रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशाप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फुटपाथ मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 3 प्रकरणांची नोंद करून 3,000/ रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 23 प्रकरणांची नोंद करून 4,600/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 7 प्रकरणांची नोंद करून 7,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.



तसेच उपद्रव शोध तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे. बर्थ अँड बेयोंड यांनी बायो-मेड कचरा रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. 25,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. धरमपेठ झोन अंतर्गत मे. श्री राम नथ्थुजी नखाते यांनी सी अँड डी कचरा टाकल्याबद्दल रु. 10,000/- रुपयाचा दंड वसुल करण्यात आला. नेहरू नगर झोन अंतर्गत मे. ताज श्री मेडीकल यांनी बायो-मेड कचरा रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. शांती सुगंध भंडार यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. उपद्रव शोध पथकाने 5 प्रकरणांची नोंद करून रू. 60,000/- दंड वसूल केला.